# प्रकरण - तिसरे

---

# दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदयाचा दृष्टिकोन

## प्रकरण - तिसरे

## दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदयाचा दृष्टिकोन

Unto this last या जॉन रस्कीनच्या पुस्तकाचा मो. क. गांधींवर फार मोठा प्रभाव पडला होता. याच पुस्तकाच्या विचारानुसार समाज निर्माण करण्याचा गांधींचा विचार होता. त्यानुसार आदर्श समाजरचनेचा साचा त्यांनी आपल्या मनात तयार केला. त्याचा परिणाम म्हणून Unto this last चा गुजराथी भाषेत अनुवाद केला. आणि त्यास 'अंत्योदय' हे नाव दिले. त्यामध्ये फक्त अंत्याच्या उदयाचा विचार मांडला होता. परंतु संपूर्ण समाजाचा उदय व्हायचा बाकी असल्याने अंत्योदया ऐवजी सर्वांच्या उदयाच्या हेतूने 'सर्वोदय' हे नाव दिले. परंतु सर्वोदयाचा विचार समाजात पोहचवण्याचे कार्य गांधींना शक्य झाले नाही. त्यांच्यानंतर अनेक गांधीवादी विचारवंतांनी सर्वोदयाचा विचार समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला. विनोबा भावे यांनी सर्वोदयाच्या कार्यास सर्वप्रथम सुरूवात केली. त्यांनंतर दादा धर्माधिकारी यांचे नाव सर्वोदयाच्या योगदानात महत्त्वाचे आहे.

दादा धर्माधिकारींनी गांधी-विनोबा भावे यांचे सर्वोदयाचे तत्त्वज्ञान समाजात रूजवण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे. मोठ्या प्रमाणात वाढत चाललेल्या केंद्रीकरणाला आळा घालण्यासाठी, समाजातील वरिष्ठस्तरापासून कनिष्ठस्तरापर्यंत विकेंद्रित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यांनी सर्वोदयाचे माध्यम निवडले. १९३८ मध्ये गांधींनी 'सर्वोदय' नावाचे मासिक चालू केले होते. त्याच्या संपादनाची संपूर्ण जबाबदारी काका कालेलकर आणि दादा धर्माधिकारी यांच्यावर सोपवली होती. तेव्हापासून ते सर्वोदयाचे काम पाहत होते. १९४२ च्या 'भारत छोडो आंदोलना'च्या वेळी बहुतांश कार्यकर्ते तुरूंगात गेले होते. त्यावेळी 'सर्वोदय' मासिक बंद ठेवले होते. परत वाचकांच्या मागणीचा विचार करून ते चालु केले. १९४८ पासून विनोबा भावे 'सर्वोदय' व 'सर्वसेवा संघा'च्या स्थापनेने सर्वोदयाचे अर्ध्वयु बनले होते. सर्वोदयाच्या कार्यात मदत



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

करण्याची विनोबा भावे यांनी दादा धर्माधिकारी यांना अट घातली आणि ती दादा धर्माधिकारींनी मान्य केली. त्यानंतर दादा धर्माधिकारींनी सर्वोदयाच्या प्रसाराचे कार्य चालू केले. त्यासाठी भाषणे, लेख, व्याख्याने या माध्यमांचा वापर केला. सर्वोदय प्रसारासाठी वाणीचा आणि लेखणीचा प्रवास चालू झाला. 'सर्वांचा उदय' हे सर्वोदयाचे सूत्र समाजात रूजवण्यासाठी त्यांनी सर्वोदयाच्या कार्यात स्वत:ला झोकून घेतले. बिहारमधील साखोदेवरा आश्रमात सलग सात दिवस सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानावर भाषणे दिली. त्यामध्ये, "सर्वोदयाची भूमिका, सर्वोदय तत्त्वज्ञानाचे खंडन नसून परिपूर्ती आहे. आर्थिक संयोजन, क्रांतीची प्रक्रिया इ. संदर्भात सर्वोदय हे समाजवादाच्या पूढचे पाऊल आहे." (धर्माधिकारी दादा (१९९६)२१४). असे दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयासंबंधी विचार मांडले व सर्वोदयाचे तत्त्वज्ञान अधिक विकसित केले.

**धर्माधिकरींची सर्वोदय संकल्पना :**

सर्वोदय म्हणजे 'सर्वांचा उदय' असा गांधींनी सर्वोदयाचा अर्थ सांगितला आहे. ह्याच अर्थाचा आधार घेऊन अनेक गांधीवादी विचारवंतांनी सर्वोदयाच्या अर्थाबाबत आपला विचार मांडला. यामध्ये दादा धर्माधिकारींच्या सर्वोदयाचा विचार महत्त्वाचा आहे. सर्वोदयाच्या अर्थाबाबत दादा असे मत व्यक्त करतात की, "सर्वोदय शब्दाचा अर्थ नवीन असला तरी त्याचा अर्थ सर्वांचे जीवन बरोबरीने संपन्न व्हावे एवढाच आहे. जीवनाचा अर्थ आहे विकास, अभ्युदय किंवा उन्नती. सर्वांचा सह-विकास व्हावा यासाठी सर्वोदय होय." (धर्माधिकारी दादा (१९९८)१४). अशा प्रकारे गांधींच्या सर्वोदय संकल्पनेचा अर्थ सांगितला आहे. सर्वोदयाच्या अर्थाबरोबर त्यांनी सर्वोदयाचा उद्देश सांगितला आहे. "एका सोबत समान स्वरूपातून सर्वांचा उदय व्हावा हा सर्वोदयाचा उद्देश आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१४). असा मांडला. दादांनी मांडलेला सर्वोदयाचा विचार सर्वांगिण असल्यामुळे तो सर्वांच्या विकासाचा आणि कल्याणाचा विचार आहे. दादांनी सर्वोदय म्हणजे तुझा आणि माझा उदय नव्हे तर सर्वांचा उदय म्हणजे सर्वोदय

असा अर्थ स्पष्ट केला आहे. सर्वोदय समाजामध्ये कोणही प्रथम आपल्या स्वतःच्या उदयाचा विचार करणार नाही. "सर्वोदयाचा संकल्प अल्प नाही, महान आहे. आणि फक्त महानच नाही. तर समग्र आहे." (डॉ. पुष्पिता (१९९९)१३). असा दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाचा व्यापक विचार सांगितला आहे. सर्वोदय विचार समग्र घटकांच्या विकासाचा विचार करते. तेव्हा अस्तित्त्वात असणारी समाजव्यवस्था बदलून नवीन शोषणमुक्त समाजरचना, आणि सर्वकल्याणकारी समाजाची म्हणजे सर्वोदय समाजाची स्थापना करण्याचा दादांचा प्रयत्न होता. प्रस्थापित व्यवस्थेत सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाची गरज प्रतिपादताना दादा धर्माधिकारी सद्यःकालीन परिस्थितित काही दोष दाखवतात ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**सद्यःकालीन परिस्थिती :**

भारतीय समाजव्यवस्था ही जात-पात, धर्म, वंश, लिंग यांच्या आधारावर उभी होती. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात विषमता, भेदभाव निर्माण झाला होता. समाज हा वरिष्ठ आणि कनिष्ठ या दोन स्तरावर विभागलेला आहे. त्यामुळे स्त्रिया, बालके, अल्पसंख्यांक यांना समाजात गुलामगिरीसारखी वागणूक दिली जात होती. एका बाजूला गगनाला भिडणारी श्रीमंती आणि दुसरीकडे डोळ्यांन न पाहवणारे, कानांनी न ऐकवणारे अठराविश्वे दारिद्र्य होते. अशा या विषम समाजात अल्पसंख्यांक, स्त्रिया, बालके, रोगी, कैदी यांची स्थिती अत्यंत शोचनीय होती. यावर दादा धर्माधिकारी निर्देश करतात.

**अ ) अल्पसंख्यांकाची स्थिती :**

डार्विनचा 'मत्स्यन्याया'चा सिद्धांत म्हणजे, मोठा मासा लहान माशाला खातो. या सिद्धांतामधील मोठ्या आणि लहान माशाच्या संबंधाप्रमाणे समाजात बहुसंख्यांक आणि अल्पसंख्याक यांचा संबंध असतो. असा दादा धर्माधिकारी यांचा विचार आहे. अल्पसंख्यांक वर्ग बहुसंख्यांक वर्गाच्या वर्चस्वाखाली दबलेला आहे. अल्पसंख्यांक वर्ग मर्यादित असतो आणि अमर्याद असणारा बहूसंख्यांक वर्ग समाजात आपली सत्ता

प्रस्थापित करतो आहे. संपूर्ण समाज आपल्या नियंत्रणाखाली ठेवतो. यामध्ये अल्पसंख्यांकावर अन्याय, जुलुम, जबरदस्ती होते. यापासून सुटका करण्यासाठी अल्पसंख्यांक वर्ग अलिप्त राहणे पसंत करताना दिसतो आहे. त्यातून अल्पसंख्यांक वर्गात मागासलेपणाची भावना निर्माण होते. ते विकासापासून वंचित राहतात. तेव्हा अल्पसंख्यांकाचा विकास करण्यासाठी त्यांचे समाजात असणारे स्थान बदलून त्यांना बहूसंख्यांकाप्रमाणे वागणूक देणे गरजेचे आहे. बहूसंख्यांकांच्यात मत-परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. बहूसंख्यांकांच्यात मत-परिवर्तन घडवून अल्पसंख्यांकांनाही बहूसंख्यांकाप्रमाणे वागणूक देणारी, शोषणमुक्त, अन्यायमुक्त समाजरचना निर्माण करण्याची दादा धर्माधिकारी यांची भूमिका होती. ते म्हणतात, "एका गावात शंभर घरे आहेत. त्यामध्ये ९८ सवर्णांची आणि २ हरिजनांची. तेव्हा ९८ सुखी आणि २ दुःखी राहील्यास काही नुकसान होणार नाही. त्यामध्ये बहूसंख्यांकांचा समावेश आहे. परंतू त्यामध्ये व्यापकता नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)१६). परंतू सर्वोदयाचा विचार व्यापक आहे. ९८ घरांच्या सुखाचा विचार मोठा असला तरी तो सर्वांगीण नाही. कारण तो फक्त आकारानेच मोठा आहे. तो सर्वव्यापी नाही. तेव्हा १०० पैकी ९८ कुटुंबांच्या विकासापेक्षा १०० पैकी १०० चा विकास झाला पाहिजे. असा सर्वोदयाचा विचार असेल असे दादांचे मत आहे.

सर्वोदय म्हणजे संपूर्ण समाजाचा विकास होय. दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदयाच्या विचारात अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक या दोघांच्याही विकासाची प्रक्रिया समाविष्ठ आहे. अल्पसंख्याकांच्या परिस्थितीप्रमाणे स्त्रिया आणि बालके यांचीही तिच परिस्थिती आहे.

**ब ) स्त्रिया आणि बालके यांची स्थिती :**

प्राचीन काळापासून स्त्रियांना योग्यतेची वागणूक मिळालेली नाही. त्या गुलामगिरीतच जीवन जगत आहेत. दादा धर्माधिकारी म्हणतात, "स्त्रियांना परंपरेपासून

कमजोर मानले जाते." (धर्माधिकारी दादा(१९९८)१७). स्त्रियांची जेथे देवी म्हणून पूजा केली जात होती तेथे स्त्रियांना दासी मानले जात होते. त्यांना भेट, नजराना म्हणून एकदुसऱ्याला बहाल केले जात होते. उच्च कुळामध्ये स्त्रियांना पडद्याआड रहावे लागत असे आणि कनिष्ठ वर्गातील स्त्रियांना मोलकरीन म्हणून गुलामगिरीची वागणूक मिळत होती. याबद्दल दादा असे वक्तव्य करतात की, "भगवतगीतेतही 'स्त्री-वैश्य-शुद्र' यांची एक श्रेणी मानली आहे. तर भाष्यकारांनी त्यापूढे जावून 'स्त्री-पशु-शुद्रादिकानाम'." (धर्माधिकारी दादा (१९८९)१७). अशा प्रकारे स्त्रियांना पशु आणि शुद्रांच्या श्रेणीत नेवून बसवले होते. आजच्या समाजव्यवस्थेत पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया आणि बालके यांची संख्या कमी होत आहे. ती वाढवण्यासाठी प्रयत्न होत नाहीत. त्यांना समाजात गौण स्थान असल्यामुळे ते उपेक्षित जीवन जगत आहेत. तेव्हा त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी कोणताही भेदभाव, वर्गवारी न मानता सर्वांच्या बरोबर स्त्रिया आणि बालके यांचा विकासाचा विचार सर्वोदय समाजात करण्यात येईल. अशी दादा धर्माधिकारी यांची भूमिका होती. त्यांच्या मते, "सर्वोदय विचार सार्वभौम आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१७). त्यामुळे पुरूषप्रधान संस्कृतीला सर्वोदय समाजात स्थान असणार नाही असा दादांचा विश्वास होता. अल्पसंख्यांक, स्त्रिया, बालके यांना जशी सद्याच्या परिस्थितित वागणूक दिली जाते तिच वागणूक रोग्यांना, कैद्यांना दिली जात आहे.

**क ) रोग्यांची, कैद्यांची स्थिती :**

प्रचलित समाजव्यवस्थेत वरील लोकांप्रमाणेच रोग्यांची आणि कैद्यांची अवस्था आहे. रोग्यांना खूप हिनतेची वागणूक दिली जाते. कुष्ठरोग्यांसारख्यांना तर समाज वाळित टाकतो. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. आणि त्यांची मानसिक विकासाची क्षमता खालावते. रोग्यांप्रमाणे अपराधी व्यक्तींच्याबाबत ही समाजाची तशीच भूमिका आहे. समाजाकडून गुन्हेगार प्रवृत्तीला प्रोत्साहन दिले जाते. परत तोच समाज अपराध्यांवर गुन्हेगारीचा शिक्कामोर्तब करतो. दादा धर्माधिकारी यांनी यांच्याबाबत

समाजाची अशी भूमिका व्यक्त केली आहे की, " अपराध्यांची संख्या ही फारच कमी असते. मग त्यांच्या सुधारणेविषयी कशाला विचार करा?" (धर्माधिकारी दादा (१९९८)१७). अशी समाजाची भावना असल्याने व त्यांची संख्या अल्प असल्याने त्यांच्या विकासाकडे लक्ष दिले जात नाही. रोग्यांना आजारपणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करून त्यांची सेवा केली जावी असा सर्वोदयात विचार मांडला आहे. कारण सर्वोदय समाज व्यवस्थेत सर्व मानवप्राण्याच्या भूतदयेचा विचार मांडला आहे.

**दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदयाचा विचारः**

गांधीच्या मृत्यूनंतर त्यांच्या सर्वोदयाच्या विचारांना आणि कृतीला प्रत्यक्ष कार्याची जोड देण्याचा गांधीवादी कार्यकर्त्यांनी निर्णय घेतला. परंतु सर्वोदय कार्यासाठी लाभलेले दादा धर्माधिकारी यांचे योगदान अधिक महत्त्वपूर्ण होते. १९३८ मध्ये 'सर्वोदय' मासिकासाठी दादा धर्माधिकारी यांनी काम चालू केले. 'सर्वोदय' आणि 'सर्वसेवासंघा'च्या स्थापनेनंतर सर्वोदयाचा प्रसार हेच त्यांनी आपले जीवनकार्य ठरविले. आणि संपूर्ण समाजाच्या कल्याणाचे व्रत स्वीकारले. आर्थिक व्यवस्थापन व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या अहिंसक क्रांतीचे विवेचन दादांनी सर्वोदय मासिकात केले. त्यांना गांधीच्या विचारांचा समाज निर्माण करायचा होता. म्हणून गांधीविचारसरणीला अनुसरून सर्वोदयाचा सिद्धांत दादा धर्माधिकारी यांनी पुढीलप्रमाणे सांगितला. याविषयी ते म्हणतात, "सभ्यतेची प्रक्रिया अशी आहे की, दुसऱ्यांना ती निज बनवते, आपले बनवते, अभेदाची आणि अद्वैताची स्थापना करणे हा सर्वोदय समाजशास्त्राचा सिद्धांत आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)२९). यावरून सर्वोदयाची वृत्ती ही मानवतेची असलेली दिसते.

दादा धर्माधिकारींचा सर्वोदयाचा विचार व्यक्तीनिरपेक्ष आणि ग्रंथनिरपेक्ष जीवनदानाचा विचार आहे. सर्वोदयात कोणी पाहिले आणि कोणी शेवटचे मानले जात नाही. कारण सर्वोदयात दादांना व्यापक जीवन मूल्यांची स्थापना करायची आहे. म्हणूनच भारतात सत्य, अहिंसा यांचा प्रसार करणारे सर्वोदय सेवक निर्माण व्हावेत अशी त्यांची

इच्छा होती. राज्यविहिन, जातीविहिन, शोषनविहिन समाजाची स्थापना करणे हे दादा धर्माधिकारींचे उद्दिष्ट होते. त्यामुळे अहिंसेच्या माध्यमातून समाजपरिवर्तन करण्यासाठी सर्वोदयाचा विचार प्रत्यक्षात आणणाचा प्रयत्न केला. मानव हा समाजाचा मुख्यकेंद्र आहे. समग्र मानव जातीचा विकास करण्याचा हेतू दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय विचारात मान्य केला आहे. तेव्हा मानवामध्ये प्रथम परिवर्तन होणे गरजेचे आहे. याबद्दल दादा म्हणतात, "हृदय परिवर्तनाचा आरंभ हा आपल्यापासून होतो." (धर्माधिकारी दादा (१९९८)५५). परिवर्तनाची सुरूवात ही प्रत्येकाने स्वत:पासून केल्यास त्यासाठी क्रांतीची गरज भासत नाही. समाजवाद हा प्रथम वस्तू-परिवर्तनावर भर देतो. आणि नंतर व्यक्ती परिवर्तनाकडे वळतो. परंतु सर्वोदय विचारात व्यक्तींच्या हृदय-परिवर्तनाला अग्रस्थान दिले आहे. विनोबा भावेंनी समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी भूदान, ग्रामदान प्रक्रियेत अहिंसक मार्गाचा समाज-परिवर्तनासाठी अवलंब केला होता. म्हणूनच सर्वोदय समाजात सत्य, अहिंसा या तत्त्वांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

'मेहनत माणसाची आणि दौलत भगवंताची' ही सर्वोदयाची श्रमाबाबतची भूमिका आहे. त्यामध्ये श्रमाचा संबंध हा कामगार वर्गाला मिळणाऱ्या मोबदल्याशी केला जात नाही. तर श्रमाचा संबंध सामाजिक मूल्यांशी जोडण्यात येतो. दादा धर्माधिकारी यांनी, "नफ्याकरिता उत्पादन भांडवलशाही, उपयोगाकरिता उत्पादन हा समाजवाद आणि शेजाऱ्यांकरिता म्हणजे माणसाकरिता उत्पादन हे सर्वोदय" (धर्माधिकारी दादा (१९९८)१२९). असे समीकरण मांडले आहे. सर्वोदय समाजव्यवस्थेत प्रत्येकाने समाजासाठी, दुसऱ्यासाठी कोणत्याही वस्तूचे, सेवेचे उत्पादन करायचे असते. म्हणूनच प्रचलित समाज व्यवस्थेतील उत्पादनाचे तंत्र बदलण्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी खालील सूत्र सांगितले आहे.

"१) श्रम हिच संपत्ती ही भांडवलशाही.

२) श्रमातून अतिरिक्त मूल्य निर्माण होते हा समाजवाद

३) श्रम हे आर्थिक मूल्य नव्हे. ते मानवी मूल्य आहे. म्हणून श्रमाचे सुद्धा मोल नाही. ह्या अर्थाने ती संपत्ती नव्हे हा सर्वोदय आहे." (धर्माधिकारी तारा (१९९९)१८२). भांडवलशाहीत श्रमास संपत्ती मानल्याने श्रमास अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. श्रमातून अतिरिक्त मूल्य मिळत असल्याने समाजवादातही श्रमास महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्वोदयामध्ये श्रमाला मानवी मूल्य मानले आहे. तेव्हा सर्वोदय हे समाजवादाच्या पुढचे पाऊल आहे हे स्पष्ट होते.

**सर्वोदयाचे सांस्कृतिक आधार :**

सर्वोदयाचे स्वरूप हे मूलतः सांस्कृतिक आहे. सांस्कृतिक आधारामध्ये मानवीय आणि नैतिक मूल्यांचा समावेश केल्यास सर्वोदय समाज स्थापन होवू शकेल. दादा धर्माधिकारी यांच्या मते, "ज्या दिवशी आपण नैतिक आणि मानवीय मूल्यांच्या आधारावर समाजाची रचना करू शकू त्या दिवशी आपल्याला समजेल की, आमचे सर्व मतभेद विलिन होवून जातील." (धर्माधिकारी दादा (१९९८)२१६) यातूनच एकसंघ समाज निर्माण होईल. समाजात मतभेद हे विकासाच्या माध्यमातून उद्‌भवतात त्यामुळे सांस्कृतिक मूल्यांच्या स्थापनेची साधने सांस्कृतिक असावी लागतात. असा विचार दादांचा होता. समाज स्थापनेची साधने सांस्कृतिक नसतील तर त्यातून संघर्ष निर्माण होतो.

या संघर्षातून अहिंसक क्रांतीचा प्रत्यय येतो. म्हणूनच दादा धर्माधिकारी म्हणतात, "आज विज्ञानाला सत्तेच्या गुलामगिरीपासून मुक्त करायचे आहे. त्यासाठी मानवीय संस्कृतीला क्रांतीकारक मूल्य बनवले पाहिजे." (धर्माधिकारी दादा(१९९८)२२२).

सर्वोदयाच्या सांस्कृतिक आधाराचे मानवीय विभूतीयोग हे एक मूल्य आहे. " हे युग मानवीय विभूतीचे युग आहे. विभुतीयोग पृथक वस्तु आहे. स्थळ, देह-पूजा, प्रकृति-पूजा, पृथक-वस्तू आहे. विज्ञान पृथक आहे. शास्त्रज्ञांनी असे म्हंटले आहे की, मानवाच्या शरीराशिवाय काहीही नाही. या दोघांचा जिथे समन्वय आहे. आणि या दोघांत

अतिरिक्त ज्यामध्ये मानवीय तत्त्वही आहे यास विभूती-योग म्हणतात." (धर्माधिकारी दादा (२००२)२४३). अशी विभूती-योगाचे विवेचन व्याख्या दादा धर्माधिकारी यांनी केले आहे. सर्वोदय समाजात मानवीय विभूतीला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. कारण सर्वोदय समाजाचा सर्वसाधारण व्यक्ती हाच मुख्य घटक आहे. दादांच्या मते, "मानवीय विभूती कडे गेले पाहिजे. मानवीय विभूतीची पूजा असेल तर, राजा आणि अधिनायक दोघांचे युग संपेल. आणि साधारण नागरिकांचेच युग येईल." (धर्माधिकारी दादा (२००२)२४३). असे त्यांना वाटते. सर्वोदयाच्या केंद्रस्थानी व्यक्ती आहे. त्यामुळे व्यक्तीच्या विकासासाठी मानवीय विभूतीचे दर्शन होणे गरजेचे आहे. सर्वोदय समाजाचे सांस्कृतिक मूल्य हे संत, वीर आणि नागरिक यांच्यावर आधारित आहे. दादा असे मांडतात की, "सध्याची जी मानवीय विभूती असेल ती मानवाचे व्यक्तीत्त्व असेल. त्यामध्ये सैनिक, संत आणि नागरिक या तिघांचे सामंजस्य असेल. या तीन गुणांमधून मानव संवादी बनेल." (धर्मधिकारी दादा (१९९८)२२१). या मानवाच्या संवादातून आणि समन्वयातून सर्वोदय समाजाची निर्मिती होईल अशी त्यांना अपेक्षा होती.

समाजाच्या संरक्षणासाठी मार्क्सने सैनिकांची गरज नसल्याचे विधान केले आहे. त्याबद्दल दादा धर्माधिकारी यांचे मत आहे. की, "राष्ट्रामध्ये सेना असू नये. नागरिकांनीच सैनिक बनले पाहिजे. सैनिक आणि नागरिक यांच्यातील अंतर नष्ट केले पाहिजे. तसेच उत्पादक आणि अनुत्पादक यांच्यातील अंतर नष्ट केले पाहिजे." (धर्माधिकारी दादा (१९९८)२२३). सर्वोदय समाजात संघर्ष, मतभेद असणार नाहीत. त्यामुळे तेथे सैनिकांची गरज भासणार नाही, असा विचार होता. विनोबा भावेंनी सर्वोदय समाजासाठी वेळप्रसंगी प्राण पणाला लावणारे शांतीसैनिक निर्माण केले आहेत. त्यामुळे वेगळया सैनिकांची गरज भासणार नाही. नागरिकांनीच सैनिक झाल्यास शस्त्राचेही सांस्कृतिक मूल्य नष्ट होते आहे म्हणून दादांनी शस्त्राचेही दोन सांस्कृतिक मूल्ये सांगितली आहेत. त्यामध्ये "१) वीर वृत्तीचा विकास होतो. आणि २) दुर्बलांचे संरक्षण होते. ही दोन्ही



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मूल्ये जोपर्यंत अस्तित्त्वात होती तोपर्यंत सांस्कृतिक विकासाचे तत्त्व शस्त्रामध्ये होते." (धर्माधिकारी दादा (२००२)२४८). परंतु सर्वोदय समाजात संरक्षणाची आणि वीरतेचीही गरज नाही. म्हणूनच नागरिक आणि सैनिक यांच्यात भेद होण्यासाठी नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता आहे. सर्वोदय समाजामध्ये जसे शस्त्राचे मूल्य नष्ट झाले आहे. तसेच यंत्राचे आणि प्रचलित लोकतंत्राचे मूल्य नष्ट होणे गरजेचे आहे.

समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांमध्ये स्थळ आणि वेळ यांनाही महत्त्व आहे. स्थळ, काळ ही परमेश्वराची विभूती आहे. त्यांच्या मते, "परमेश्वराची विभूती बनून जी वेळ आली आहे. तिला आपण 'आजच्या जमाना' म्हणतो. हा जमाना आता अशी घोषणा करत आहे. की, नि:शस्त्रीकरणाशिवाय मानवी मूल्यांची स्थापना होणार नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)२२४). विनोबा भावे यांनी केलेल्या शांतीसैनिकांच्या विचारातूनही नि:शस्त्रीकरणाचा बोध होतो. सर्वोदय समाज हा अहिंसक समाज आहे. तेव्हा नि:शस्त्रीकरणाचे तत्त्व सर्वोदय समाजात अंगभूत असणे गरजेचे आहे. दादा याबद्दल म्हणतात की, "अशा परिस्थितीत युद्ध आणि शस्त्र दोघांचे ही सांस्कृतिक मूल्य नष्ट होते." (धर्माधिकारी दादा (१९९८)२२४).

सद्य:कालीन समाजात व्यक्तीच्या सुखात सर्वजन भागिदार असतात. पण दु:खात कोणही जवळ थांबत नाही. दादा धर्माधिकारींची मात्र अशी भूमिका आहे की, "दु:खाची विभागणी केल्यास दु:ख हलके होते. आणि सुखाची विभागणी केल्यास ते दुप्पट होते. हा सुख आणि दु:ख यामधील फरक आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)२३). प्रत्येकाने सर्वांच्या सुख:दुखात सहभागी होवून सर्वांच्या सुखाचा प्रयत्न करावा. सर्वोदय समाजात सुखदु:खाचा विचार करताना दादा असे विवेचन करतात की, "मी दुसऱ्याचा अधिकार बघणार आहे. आणि माझे कर्तव्य बघणार आहे. याप्रमाणे प्रत्येकजण विचार करेल की, दुसऱ्याच्या स्वार्थात माझे हित असेल. जर तुम्ही माझ्या स्वार्थात आपले हित बघाल तर मी तुमच्या सुखात माझे हित बघेल. तेव्हा दोघेही एकमेकांचे दु:ख बघतील आणि

दोघांच्याही हिताचा विचार करतील." (धर्माधिकारी दादा (१९९८)२२५). हा सर्वोदय समाजाच्या विचार आहे. सामाजाच्या हितासाठी सर्वांनी परस्परांचे हित साधने गरजेचे आहे हेच स्पष्ट होते.

**कृषीप्रधान अर्थव्यवस्था :**

सर्वोदय समाजास कृषीप्रधान अर्थव्यवस्था निर्माण करायची आहे. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याचा प्रश्न निर्माण होईल. अन्नधान्याच्या पूर्ततेसाठी कृषीपूरक उत्पादन असणारी अर्थरचना सर्वोदयास योग्य वाटत होती. याविषयी दादा धर्माधिकारी म्हणतात, "जगासमोर लोकसंख्येचा प्रश्न आहे. लोकसंख्येचा प्रश्न हा अन्नधान्याचा प्रश्न आहे. आणि अन्नाच्या प्रश्नाचा अर्थ शेतीचे उत्पादन आहे. यासाठी जगाचे अर्थशास्त्र कृषी-केंद्रित अर्थशास्त्र आवश्यक आहे. अन्यथा अन्नाची समस्या कधीही संपणर नाही." (धर्माधिकारी दादा (२००२)२५०). कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत जमिन मालकांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे सर्वसामान्य वर्ग सुखी राहू शकतो. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेतेबाबत दादांचे असे मत आहे की, "समाजव्यवस्थेत शेतकरी मुख्य असतो." (धर्माधिकारी दादा (१९९८)२२६) त्यामुळे तेथे सर्वांचा विकास व उदय होतो. म्हणून सर्वोदयात कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे प्रयोजन दादांनी केले आहे.

उत्पादनाच्या प्रक्रियेतून व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होताना दिसून येतो. प्रथम उत्पादनाच्या प्रक्रियेचा विकास होवून उत्पादनात असणाऱ्या सर्व घटकांत सुसंगतपणा असणे गरजेचे आहे. त्यामध्ये त्या उत्पादनाच्या संबंधित असणारे विशेषतज्ज्ञ, मालक, मजूर यांनी समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. दादा म्हणतात "जेथे भूक आहे तेथे उत्पादन झाले पाहिजे. जेथे उत्पादन कमी आहे तेथे उत्पादन अवश्य केले पाहिजे." (धर्माधिकारी दादा (२००२)२६५). सर्वोदय समाजात उत्पादन नफ्याच्या भूमिकेतून केले जात नाही. तर दुसऱ्यांच्या, इतरांच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन केले जाते. यावरून विश्वकुटुंबाच विचार पुढे येतो.

विश्वकुटुंबाची सुरूवात ग्रामीण भागातून होते. सर्वोदय विचाराच्या कृषीकेंद्रित अर्थव्यवस्थेत स्वत:साठी कोणीही उत्पादन करत नाही तर ते सर्वांसाठीचे असते. यातूनच ग्रामकुटुंबापासून विश्वकुटुंब निर्माण होईल असे दादांना वाटते.

**साम्यवादी क्रांती आणि सशस्त्र क्रांतीवरिल आक्षेप :**

जगात आजपर्यंत अनेक क्रांत्या झाल्या आहेत. त्यांचा उद्देश हा विशिष्ट लोकांच्या विकासाचा होता. यामध्ये रशियाची क्रांती, चीनची क्रांती आणि टिटोची क्रांती यांचा समावेश होतो. ह्या सर्व क्रांत्यांचा उद्देश विशिष्ट अशा वर्गाला नेस्तनाभूत करण्याचा होता. या क्रांत्या साम्यवादी विचारसरणीवर आधारित आहेत. यांचा उद्देश फक्त कारखान्यातील कामगार विकासाचा होता. त्यामुळे समाजातील इतर वर्ग विकासापासून वंचित राहिला होता. तेथे परिवर्तनासाठी हिंसा, संघर्ष यांचा अतिरेकी वापर होत होता. त्याबद्दल दादांचे असे मत आहे की, "साम्यवादी क्रांतीमध्ये क्रांतीचा अग्रदूत कारखान्यातील श्रमिक वर्ग मानला गेला." (धर्माधिकारी दादा (२००२)२७५). समाजातील भांडवलदार वर्गाकडून कामगार वर्गाची पिळवणूक होत होती. ती थांबवणे आणि भांडवलदार वर्गाच्या हातातील उत्पादनाची साधने कामगार वर्गाच्या मालकीची करण्यासाठी साम्यवादी क्रांतीचा उदय झाला. मालकांची संख्या जस-जशी कमी होत जाईल तस-तशी मजुरांची संख्या वाढत जाईल. शंभरपैकी नव्याण्णव मजूर आणि एक मालक राहिल. कारखान्यातील सर्व कामगारांचे विचार समान असल्यामुळे त्यांच्या मनात क्रांतीची प्रेरणा निर्माण होईल. आणि अपरिहार्य रितीने क्रांती घडून येईल हीच, 'मजूरांची क्रांती' असेल अशी कार्ल मार्क्सने क्रांतीची कल्पना मांडली.

साम्यवादी क्रांतीत फक्त कामगार वर्गालाच क्रेंद्रस्थानी मानले आहे. इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगाराचे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न साम्यवादी क्रांतीने केला नाही. रशियन क्रांतीत कामगार वर्गाचा समावेश केला असल्याने साम्यवादी क्रांती, सार्वजनिक क्रांती होवू शकली नाही. क्रांतीचा विरोध भांडवलदार वर्गाला होता. यावरून

साम्यवादी क्रांतीचे स्वरूप सर्वांगीण नसल्याचे स्पष्ट होते. क्रांतीचा उद्देश समाज परिवर्तनाचा असतो. साम्यवादी क्रांतीतही समाज परिवर्तनाचे उद्दिष्ट होते. त्यामुळे समाजात द्वेष, मत्सर निर्माण झाला. दादांच्या मते, "क्रांतीची मुळ प्रेरणा द्वेष नाही. तर मानवीय सहानुभूती आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)२७२). हिंसक क्रांतीतून व्यक्तीविकास होत नाही तर व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होतो. त्यामुळे देशात अराजकता निर्माण होते. असे अनेक दोष साम्यवादी क्रांतीमध्ये असल्याने साम्यवादी क्रांती दादांना मान्य नव्हती.

सशस्त्र क्रांतीच्या विचाराबाबत दादा धर्माधिकारी यांनी तिव्र आक्षेप घेतला आहे. सशस्त्र क्रांतीमध्ये हिंसेचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला आहे. दादांच्या मते, सशस्त्र क्रांती म्हणजे, "सरकारच्या हातात असलेली हिंसेची उपकरणे आमच्या हातात आली पाहिजेत. हाच आता सशस्त्र क्रांतीचा अर्थ आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१८३). येथे मानवी मूल्यांचा ऱ्हास होतो. सशस्त्र क्रांतीचे अधिष्ठानच शस्त्र-शक्ती असते. त्यांची अशी भूमिका आहे की, "सशस्त्र क्रांती अन उपयुक्त नाही तर ती अवांच्छनिय आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)८२). येथे व्यक्तीचे व्यक्तित्त्व नष्ट होते. मानवी विकासाचा दृष्टिकोन बाजुला सारला जातो. मानवी विकासासाठी मानवी बुद्धीची गरज असते. परंतू मानवी बुद्धीचा सशस्त्र क्रांतीत अभाव असतो. त्यामुळे क्रांतीकारी वर्गाकडून उद्दिष्ट प्राप्तीसाठी कोणत्याही परिणामांचा विचार न करता हिंसा, संघर्ष, रक्तपात यांचा अवलंब केला जातो. याबद्दल दादा म्हणतात, "जे लोक सशस्त्र क्रांतीचा विचार करतात ते परिस्थितीचा संपूर्ण विचार करत नाहीत. आणि परिस्थितीत बदल करण्याची शक्तीही त्यांना प्राप्त झालेली नसते." (धर्माधिकारी दादा (२००२)८३). यामुळे तो क्रांतीकारी वर्ग समाजाच्या विकासाचा विचार करत नाही. दादांनी असे म्हटले आहे की, "सशस्त्र क्रांतीसारखी अवैज्ञानिक आणि अव्यवहारिक प्रक्रिया जगात कोणतीही नाही." (धर्माधिकारी दादा (२००२)८४). अशा रितीने सशस्त्र क्रांतीची भयावह परिस्थिती

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

व्यक्त करून दादांनी अहिंसक, वैज्ञानिक आणि व्यवहारिक अशा क्रांतीची नवीन प्रक्रिया मांडली ती म्हणजे 'लोकक्रांती' होय.

**५ ) अहिंसक लोकक्रांती :**

म. गांधी व त्यानंतर विनोबा भावे यांनी अहिंसक क्रांतीचा विचार समाजात मांडला आहे. याच अहिंसक क्रांतीचा प्रभाव दादा धर्माधिकारी यांच्यावर पडला होता. विनोबांच्या अहिंसक क्रांतीच्या विचाराला अनुसरून दादा धर्माधिकारींनी नवीन क्रांतीची कल्पना समाजापूढे मांडली आहे. त्यांनी क्रांतीची व्याख्या अशी केली की, "एक खास उद्देश ठरवून नियम, साधनाद्वारे आणि नियोजित पद्धतीनुसार सामाजिक परिस्थितीमध्ये जे अंतर सिद्ध केले जाते त्याला क्रांती म्हणतात." (धर्माधिकारी दादा (२००२) २७). पृथ्वीतलावर अनेक प्रकारे परिस्थितीत बदल संभवतात. उदा. भूकंप, पूर, सुनामी यासारख्या बदलास क्रांती म्हणता येत नाही. मानवप्राण्यांच्या संपूर्ण जीवनाचा संदर्भ बदलून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी जी परिस्थिती बदलणे गरजेचे असते तो क्रांतीचा मार्ग असतो.

दादा धर्माधिकारी यांनी मानवाचा विकास करण्यासाठी मांडलेली अहिंसक क्रांती ही आजपर्यंत झालेल्या अनेक क्रांत्यांपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. त्यांच्या क्रांतीमध्ये जनतेला केंद्रस्थानी मानले आहे. संपूर्ण समाजातील जनतेला सामावून घेणारी सार्वत्रिक अहिंसक लोकक्रांती त्यांना घडवून आणायची होती. संपूर्ण समाजाच्या सहभागाशिवाय अहिंसक लोकक्रांती यशस्वी होवू शकणार नाही असे दादांचे मत होते. याबद्दल दादा म्हणतात, "आज जी क्रांती होईल ती केवळ जनतेसाठी नसेल तर, 'जनतेची क्रांती' जनतेद्वारे होईल." (दादा धर्माधिकारी (२००२)८०).

क्रांती कृत्रिम स्वरूपात होत नाही. तसेच ती कोणावर लादताही येत नाही. क्रांतीची प्रेरणा ही निसर्गतः घडून यावी लागते. विनोबा भावेंच्या भाषेत सांगायचे तर, क्रांती ही, "करूणेची क्रांती पाहिजे. आपण तिला बंधूभावाची, स्नेहाची, मानवीय

भावनेची क्रांती म्हणू या." (धर्माधिकारी दादा (१९९८) १९५). कारण क्रांती करण्यासाठी उत्पादनाची भूमिका बदलल्याशिवाय क्रांती घडून येत नाही. क्रांतीसाठी उत्पादनाची सर्वच साधने बदलावी लागतात, कारण उत्पादनाच्या साधनावर कोणा एकाची मालकी असल्यास समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. तेव्हा उत्पादनाची मालकी ज्यांच्याकडे असेल ती काढून घेऊन समााजाकडे सोपवणे गरजेचे असते. यासाठी क्रांतीत सर्वांचा समावेश असावा लागतो. दादा धार्मधिकारी म्हणतात, " समाजातील ज्या वर्गाकडे थोड्याफार प्रमाणात सुखवस्तू असतात त्या वर्गातून क्रांतीचे प्रवर्तक उत्पन्न होतात." (धर्माधिकारी दादा (१९९८)१८९). परंतू परिवर्तन करण्यासाठी क्रांतीची प्रेरणा प्रत्येक व्यक्तीत निर्माण होणे गरजेचे असते. कारण कोणी एकाने क्रांतीचा प्रयत्न करून क्रांती यशस्वी होत नाही. त्यासाठी सर्वांचा सह-विचार, सहयोग आवश्यक असतो.

समाजात असणाऱ्या उत्पादक वर्गाची वस्तूंचे, सेवांचे उत्पादन करण्याची मनोवृत्ती बदलली पाहिजे. याबाबत दादांचे असे मत आहे की, "क्रांतीची प्रेरणा द्वेषमूलक नको, प्रेममूलक प्रेरणा पाहिजे. ही प्रेरणा श्रमिकांच्या, उत्पादकांच्या अंत:करणात उत्पन्न झाली पाहिजे. तरच उत्पादकाची भूमिका पालटेल." (धर्माधिकारी दादा (१९९८)११६). उत्पादकाची प्रेरणा कशी बदलणार या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी दादांनी तीन सिद्धांत सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे,

"१) श्रम हिच संपत्ती-भांडवलशाही;

२) श्रमातून अतिरिक्त मूल्य निर्माण होते हा समाजवाद; आणि

३) श्रम हे आर्थिक मूल्य नव्हे, ते मानवी मूल्य म्हणून श्रमाचे सुद्धा मोल नाही. ह्या अर्थाने ती संपत्ती नव्हे हा सर्वोदय आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)११६). या सिद्धांताप्रमाणे उत्पादकाने श्रमाचा संबंध मोबदल्याशी न लावणे योग्य होय. तर श्रमिकांने आपले श्रम समाजासाठी दान केले पाहिजेत. श्रमदान म्हणजे काय? हे सांगताना दादा असे म्हणतात की, "श्रमदान म्हणजे मोबदल्यावाचून, कृष्णार्पण बुद्धीने श्रम समर्पण

करणे. हे जर मोठ्या प्रमाणात होवू लागले तर उत्पादकाची भूमिका बदलेल." (धर्माधिकारी दादा (१९९८) १९७). त्यामुळे क्रांतीसाठी श्रमदान होणे गरजेचे आहे. उत्पादकाची भूमिका बदलल्यामुळे ती क्रांतीच्या संदर्भात परिवर्तीत केल्यास क्रांतीचा मार्ग यशस्वी होवू शकतो. दादा म्हणतात, जगात आजच्या परिस्थितीत क्रांतीसाठी दंडशक्ती, जबरदस्ती, कायदा आणि करपद्धती यांचा स्वीकार केला जातो. या क्रांतीच्या प्रक्रियेला जनतेची संमती नसते. त्यामुळे क्रांतीसाठी पोषक वातावरण निर्माण होत नाही.

दादा धर्माधिकारी यांनी अहिंसक क्रांतीच्या प्रक्रियेसाठी स्वेच्छासमर्पण आणि संपत्तीदान यांचा मार्ग सुचविला आहे. मुलतः स्वेच्छासमर्पणासाची प्रेरणा समाजात अस्तित्त्वात नसल्याने प्रथम त्यासाठी अनुकुल परिस्थिती निर्माण करणे आवश्यक होते. मोठ्या उत्पादनाची मालकी असणारे मोठे मालक आणि लहान मालक यांच्यातील मालकी हक्काची असणारी भावना बदलली पाहिजे. विशेषतः लहान मालकांच्यात संपत्तीच्या हव्यासाची जी भावना असते ती नष्ट करणे. आणि सर्व संपत्तीचे समाजासाठी स्वमर्जीने, स्वखुशीने अर्पण करणे. म्हणजे स्वेच्छासमर्पण होय. दादांनी स्वेच्छासमर्पणा बरोबरच संपत्तीदानाचाही विचार मांडला आहे. यामध्ये प्रत्येकाने समाजासाठी आपल्या सर्व संपत्तीचे समर्पण करणे होय. कारण संपत्तीदानातून समाजात उत्पादनाच्या संग्रहाची वृत्ती नष्ट होते. आणि ती व्यक्ती आपल्या गरजेपूरतेच संपत्तीचा उपभोग घेते. यातून वैयक्तिक संग्रह होत नाही आणि जरी संग्रह झाला तरी तो समाजासाठी असतो म्हणून त्या विरोधी विचार निर्माण होत नाही. म्हणून दादा म्हणतात, "संग्रहाचे विसर्जन झाले पाहिजे, अनुत्पादन व्यवसायांचे निराकरण झाले पाहिजे आणि मालकीची किंवा स्वामित्त्वाची भूमिका बदलली पाहिजे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१७९). यासाठी दादांनी क्रांतीच्या प्रक्रियेत संपत्तीदानाचा विचार सांगितला आहे. वैयक्तिक स्वार्थासाठी व्यक्तींनी जी संपत्ती साठवलेली असेल त्या सर्व संपत्तीवर संपत्तिदानाच्या स्वीकारामुळे समाजची मालकी प्रस्थापित होईल. वैयक्तिक मालकी हक्काचे आणि अनुत्पादन वर्गाच्या

व्यवसायाचे निराकरण होईल. ही सर्व प्रक्रिया व्यक्तीच्या स्वमर्जीने होत असल्याने क्रांतीचा विरोधी विचार निर्माण होणार नाही. आणि सशस्त्र क्रांतीची भितीही राहणार नाही म्हणून दादांनी क्रांतीच्या प्रक्रियेत स्वेच्छासमर्पण, संपत्तीदानाचा स्वीकार करावा असे सुचविले आहे.

लोकक्रांतीचा विचार हा समाजपरिवर्तनाच्या उद्देशाने समाजापुढे दादांनी मांडला आहे. परिवर्तनासाठी क्रांतीचा मार्ग स्वीकारला जातो. क्रांतीसाठी स्वीकारण्यात येणाऱ्या मार्गाचा विचार मांडताना दादा म्हणतात, "क्रांतीची प्रक्रिया अशी असावी की, त्यामधून हृदय-परिवर्तन घडून येईल. आणि त्यातून प्रतिक्रांती निर्माण होणार नाही." (धर्माधिकारी दादा (२००२)८०). क्रांतीसाठी प्रत्येकाने प्रथम स्वत:मध्ये अहिंसक मार्गाने मन-परिवर्तन करणे गरजेचे असते. मत-परिवर्तन किंवा हृदय-परिवर्तन म्हणजे मूल्य परिवर्तन होय. म्हणून दादांनी क्रांतीच्या प्रक्रियेत मूल्य-परिवर्तनाला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

क्रांती ही वैज्ञानिक असावी असे दादांचे मत आहे. कारण आज विज्ञानाच्या युगात आपण वावरत असताना क्रांतीची प्रक्रिया ही विज्ञानाला अनुरूप असावी. याबाबत दादा असे मत व्यक्त करतात की, "विज्ञानाची गती आणि सामाजिक प्रगती यांच्यात मेळ घालायचा असेल तर यापूढे क्रांतीची जी मूल्ये राहतील ती केवळ जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय असता कामा नये. ती विश्वव्यापी म्हणजे सार्वभौम असली पाहिजेत." (धर्माधिकारी दादा (१९९८)७४). विज्ञान हे समाजात प्रगतीच्या दृष्टिने एक पाऊल का होईना पूढे आहे. त्याचे समाजावर वर्चस्व निर्माण होवू शकेल म्हणून सामाजिक प्रगती आणि विज्ञान यांच्यात सुसंगतपणा असणे गरजेचे आहे. यामुळे सर्वोदय विचाराला अभिप्रेत असणारी विश्वकुटुंब अस्तित्त्वात धारणा येईल. त्याचबरोबर ती क्रांती सार्वभौम असली पाहिजे. क्रांतीसाठी मूल्य परिवर्तनावर दादांनी अधिक भर दिला असल्याने क्रांतीची मूल्ये सुद्धा सार्वभौम, पारमार्थिक असावी लागतात. म्हणून त्यांनी पारमार्थिक मूल्यांच्या पाच कसोट्या सांगितल्या आहे त्या पुढीलप्रमाणे –

१) जे मूल्य सार्वत्रिक असते ते सार्वभौम/ परमार्थिक होय.

२) ज्या मूल्याचे आपण संरक्षण करू इच्छितो ते स्वत: करिता नाही इतरांकरिता ते सामाजिक मूल्य सार्वभौम होय.

३) जे मूल्य स्वत:च्या नावावर असते ते मूल्य सार्वभौम असते.

४) ज्या मूल्यांना कारण लागत नाही ते खरे मूल्य हे मूल्य सार्वभौम असते.

५) ज्या मूल्यांना कैफियत द्यावी लागत नाही आणि स्वत:चा बचाव करावा लागत नाही ते खरे मूल्य.

या कसोट्या सार्वभौम मूल्यासाठी मांडल्या आहेत. सार्वभौम मूल्यांच्या आधारावर केलेली क्रांती ही समाजरचनेसाठी उपयुक्त असते. कारण ती शाश्वत असते. म्हणून मूल्य परिवर्तनाला क्रांतीच्या प्रक्रियेचा मुख्य गाभा मानले आहे. क्रांतीसाठी मानवी स्वभाव अनुकुल असावा लागतो. आणि तो ह्रदय परिवर्तनातून घडून येवू शकतो. क्रांतीच्या मत-परिवर्तनासाठी बळजबरीचा वापर न करता अहिंसक मार्गाचा वापर केला जातो. या मत-परितवर्तनातून मानवातील प्रेरणा जागृत होतात. मूल्य-परिवर्तनाची प्रक्रिया क्रांतीसाठी आवश्यक मानली आहे.

अहिंसक मार्गाने मानवी विकासासाठी क्रांतीची प्रक्रिया निर्माण होईल. याबाबत दादा म्हणतात, "परिस्थितीचा परिणाम पुरूषावर होतो. परंतु शेवटी पुरूषाची सत्ता परिस्थितीवर चालते. व्यक्तीची सत्ता वस्तूवर चालते. हाच ह्रदय-परिवर्तनाचा आधार आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)८८). जोपर्यंत ह्रदय-परिवर्तन होत नाही तोपर्यंत समाज-परिवर्तनासाठी क्रांतीची प्रक्रिया यशस्वी होत नाही. जनतेच्या विकासाचा हेतू साध्य करण्यासाठी लोकक्रांतीची साधने अहिंसात्मक असावी लागतात. दादांनी क्रांतीचे तीन भागात विभाजन केले आहे. त्यामध्ये मूल्य-परिवर्तन, क्रांतीची प्रक्रिया, आणि क्रांतीची प्रतिके यांचा समावेश केला आहे.

क्रांतीच्या विचारात जर स्वार्थी भावना असेल तर त्यास समाजाकडून विरोध होतो आणि त्यातून प्रतिक्रांती निर्माण होते म्हणून, क्रांतीची प्रक्रिया ही स्वार्थमूलक नसावी.

समाजात असणारा क्रांतीकारी वर्ग आपल्यापासून वरिष्ठ असणाऱ्या लोकांकडे बघत नाही तर त्याचे लक्ष कनिष्ठ समाजाकडे असते. त्यामुळे क्रांतीच्या प्रक्रियेत द्वेष, मत्सर निर्माण होतो. यातून प्रतिक्रांती संभवते आणि तिची साधने हिंसक असतात. म्हणून क्रांतीच्या प्रक्रियेत स्वार्थ नसावा. मानवनिष्ठा हा क्रांतीचा आधारभूत पाया असल्यामुळे दादांच्या क्रांतीची मूळ प्रेरणा मानवीय सहानुभूती आहे. समाजात गरीबी आणि श्रीमंती यांच्यातील विषमतेमुळे क्रांतीचा उदय होतो. समाजातील गरीब वर्ग गरीबीचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतो. परंतु श्रीमंतांकडून श्रीमंतीचे निराकरण करण्याचा प्रयत्न होत नाही. म्हणून गरिबी आणि श्रीमंतीच्या निराकरणासाठी सहयोगात्मक क्रांतीचे प्रयोजन दादा धर्माधिकारींनी केले आहे. त्या बद्दल दादा असे मत स्पष्ट करतात की, "गरीबांच्या पुरूषार्थाने जी क्रांती होईल ती सार्वजनिक असेल. त्यामुळे ती सार्वत्रिक बनेल." (धर्माधिकारी दादा (२००५)३८३). जर श्रीमंतांची श्रीमंती वाढत गेली तर तेवढ्याच प्रमाणात गरीबांची गरीबीही वाढत जाईल. तेव्हा गरीबांची गरीबी आणि श्रीमंतांची श्रीमंती कमी झाली पाहीजे. गरीब लोकांमधील विवशता हे असंग्रहाच्या व्रतामध्ये बदलेल तेव्हाच समाजात मानवीय क्रांतीचा जन्म होईल. त्यावेळी गरीब आणि श्रीमंत लोकांच्यात सहयोगाची भावना निर्माण होईल. या दोघांच्या सहकार्यातून नवसमाजरचना स्थापन होईल.

श्रीमंत आणि गरीब वर्गातील व्यक्तींच्या सहयोगाने शोषणमुक्त वर्गविहिन समाजाचा पाया घालता येईल. ही प्रक्रिया क्रांतीच्या प्रक्रियेसाठी व क्रांतीप्रवण समाज रचनेसाठी योग्य असेल. म्हणजे संक्रमण अवस्थेत व संक्रमणानंतरच्या परिस्थितीत उपयुक्त असेल. परंतू त्यासाठी समाजात वर्गनिराकरणाबरोबर जाती, संप्रदाय निराकरणाची गरज तेवढ्याच प्रमाणात भासते. लोकक्रांतीच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन असल्याने तेथे सहकार्याची आवश्यकता असते. दादा धर्माधिकारींचा असा विचार आहे की, "अहिंसात्मक क्रांतीची प्रक्रिया म्हणजे 'सहयोगात्मक क्रांतीची' प्रक्रिया

तिच्यात जो प्रतिकार असेल तोदेखील परिणामी सहयोगालाच पोषक असा असेल." (धर्माधिकारी दादा (१९९८)१९७). क्रांतीच्या सहयोगात उत्पादक वर्गाबरोबर अनुत्पादक वर्गाचाही सहयोग गरजेचा असतो. म्हणून क्रांतीमध्ये सहयोगाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

साम्यवादी क्रांतीत कारखान्यातील कामगार वर्ग हा क्रांतीचा अग्रदूत होता. तर लोकक्रांतीत समाजातील सर्वसामान्य माणूस अग्रदूत आहे. असे दादांचे मत आहे. क्रांतीच्या स्वरूपात इतिहासाचा विधाता हा क्रांतीचा अग्रदूत कोणी एक विशिष्ट व्यक्ती नसेल तर, साधारण मनुष्य असेल. ज्यांच्या हातात उत्पादन परिश्रमाची औजारे किंवा पुस्तक असेल तोच खरा क्रांतीचा विधाता ठरेल. कारण साम्यवादी क्रांतीत कारखान्यातील मजूरवर्गाशिवाय कोणालाही स्थान दिलेले नाही. मजूरवर्ग संख्येने जास्त असल्याने तो संघटित स्वरूपात आहे. म्हणून त्यांचा समावेश क्रांतीत केला होता. बोल्शेविक क्रांतीत शेतकरी समाजवादी असू शकत नव्हता. म्हणूनच शेतकऱ्यांना क्रांतीत सहभागी करून घेतले नव्हते याबाबत दादांनी शेतकरी आणि मजूर यांच्या क्रांतीचा फरक सांगितला आहे. कारखान्यातील क्रांती आणि शेतकऱ्यांची क्रांती यात मूलभूत फरक आहे. तो म्हणजे कारखान्यातील मजूर हा मालकाचे काम करतो. आणि शेतकरी स्वत:चे काम करतो. शेतकरी हा स्वत:चे काम करत असल्याने तो संप करत नाही. तर दुसऱ्याचे काम करणारा कामगार वर्ग संप करतो. याबद्दल दादांचे प्रतिपादन असे आहे की, "शेतकऱ्यांच्या क्रांतीचे पर्यवसन मजूरांच्या क्रांतीत व्हावे आणि नंतर समाजक्रांती व्हावी." (धर्माधिकारी दादा (१९९८)१६९). म्हणजेच शेतकऱ्यांची क्रांती अहिंसक मार्गाने होईल असे त्यांचा विश्वास वाटत होता.

क्रांतीच्या निर्मितीचा विचार मांडतना दादा म्हणतात, "श्रीमंतीच्या दानामुळे मालकी हक्क विभागला जाईल. संपत्तीचा आणि जमिनीचा मालकी हक्क विभागेल परंतू मालकी हक्कामुळे विसर्जनाची क्रांती गरिबांच्या दानातून होईल. गरीबांच्या दानामध्ये

क्रांतीच्या बीजाचा गुणधर्म असेल." (धर्माधिकारी दादा (२००५) ४११). गरीब आणि श्रीमंत यांच्या भेदभावाची निर्मिती न होता ते परस्पर एकरूप झाले पाहिजेत. म्हणून सामाजिक क्षेत्रातील संपत्तीच्या विसर्जनाची आणि तिच्या समान विभाजनाची अहिंसक लोकक्रांती आवश्यक आहे.

आजच्या परिस्थितीत समाजाच्या अहिंसक मार्गाने परिवर्तन झाल्यास वीरक्रांती, संतक्रांती न होता नागरिकांची क्रांती होईल अशी दादांची भूमिका आहे. त्यांचा असा विचार आहे की, "लोकक्रांतीची विभूती नागरिक असतात आणि तेच नागरिक क्रांतीचे अधिष्ठाता आणि अनुष्ठाता असले पाहिजेत त्यांच्या पराक्रमातून क्रांती झाली पाहिजे." (धर्माधिकारी दादा (२००२)४३). लोकक्रांतीतून व्यक्तींच्या जीवनात संवादित्त्व येईल. विज्ञान, साहित्य, जमिन यांचे विभूतीयोग येईल आणि सर्व वस्तू मानवी जीवनाच्या विभूतीयोग बनतील. परंतू जेव्हा क्रांतीत विभूती बनेल तेव्हा मानवी जीवन सर्वोदयाचे बनेल अशारितीने दादा धर्माधिकारी यांनी संपूर्ण समाजाला सामावून घेणारा लोकक्रांतीचा विचार मांडला आहे. लोकक्रांतीच्या माध्यमातून समाजपरिवर्तन करून लोकतांत्रिक शासन व्यवस्थेची स्थापना त्यांना करायची होती. म्हणूनच त्यांनी अस्तित्त्वात असणाऱ्या राजनीतीमधील उणिवा दाखवून लोकनीतीचा आग्रह धरला आहे.

**राजनीतीवरिल आक्षेप :**

दादा धर्माधिकारी यांना प्रचलित समाजात असणारी राजकीय व्यवस्था नष्ट करून सर्वोदय समाजाची स्थापना करायची होती. लोकक्रांतीच्या माध्यमातून राजनीतीला निपटून काढण्याचा प्रयत्न त्यांचा होता. कारण, राजनीतीमध्ये अनेक दोष, उणिवा असल्यामुळे समाजाचा प्रवास विकासाच्या दिशेने होत नव्हता. फक्त राज्यकर्त्यांच्याच विकासाचा विचार राजनीती करत होती. राजनीतीमध्ये राज्यकर्त्यांचा वर्ग मुख्य असतो. त्यांच्या हातात सत्तेची सूत्रे असतात. त्यामुळे तो आपल्याच फायद्याचा विचार करतो. दादा धर्माधिकारींच्या मते, "राजाची राज्य चालविण्याची जी युक्ती आणि नीती असते त्यास राजनीती म्हणतात." (धर्माधिकारी दादा (२००२)१६१). राज्यकर्त्यांची नीती ही

कपटी असते. त्यांना सत्तेचा हव्यास असतो. त्यामुळे ते सामान्य जनतेच्या विकासाचा विचार न करता फक्त आपल्या फायद्यासाठी सुसंगत असणाऱ्या नीतीचा उपयोग करतात. राजनीतीमध्ये सत्ता केंद्रस्थानी असते. येथे व्यक्तीवर सत्तेमार्फत नियंत्रण ठेवले जाते. त्यामुळे राजनीतीत व्यक्तीविकास आणि व्यक्तीस्वातंत्र्य यांचा संकोच होतो. परिणामी समाजाचा प्रवास विकासाच्या मार्गाने होत नाही असे दिसून येते.

दादांच्या मते, 'लोकसत्तेची अधारभूत निष्ठा सत्ता आणि सामर्थ्य आहे. त्यांचे अधिष्ठान 'लोक' आहेत. परंतु राज्याचा 'राजा' हा सत्तेचा आणि सामर्थ्यांचा प्रतिक आहे." (धर्माधिकारी दादा (२००५)२१७). राजनीती सत्तासापेक्ष आणि व्यक्तीनिरपेक्ष असते. त्यामुळे तेथे व्यक्तींना गौण स्थान असते. त्यांच्या मते, "राजनीनीमध्ये मनुष्याला स्थान नाही. तर दिखाव्यांना अधिक महत्त्व आहे. मनुष्याला जेवढे महत्त्व नाही तेवढे पुतळ्यांना आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)५१८). असा दादांचा आक्षेप आहे. राजनीतीमध्ये जनता जागृक, पराक्रमी राहत नाही. तेथे बौद्धिक सावधानता आणि राजनैतिकता यांचा अभाव असतो. व्यक्ती सद्-सद् विवेक बुद्धीचा वापर करत नाही तर ती राज्यकर्त्यांच्या दबावाखाली राहते. या बाबत दादा म्हणतात की, "ज्यांना मानवतेच्या मूल्यांचे भान होत नसते. असे अनेक युद्धमान दबावकारी गट, दाबावगट राजनीतीत असतात." (धर्माधिकारी दादा (२००५)६८७). आपला हेतू साध्य करण्यासाठी अनेक प्रकारचे दबावगट निर्माण होतात. त्यांचा राज्यकर्त्यावर्गाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात संबंध असतो. त्यांचे विकासाचे तंत्र मर्यादित असल्याने संपूर्ण समाजाच्या विकासाचा विचार केला जात नाही तर राज्यकर्ते फक्त आपला स्वार्थ साधताना दिसतात.

दादा धर्माधिकारींच्या मते, आजच्या समाजात "शासनाचा धाक आणि प्रतिष्ठा वाढण्याच्या बदल्यात अराजकता आणि गुंडशाहीच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळत आहे. (धर्माधिकारी दादा (२००५)९५). सत्तेचे एकमात्र लक्ष गाठण्यासाठी निवडणूकित मोठ्या प्रमाणात गुंडशाहीचा वापर केला जातो. गुंडशाहीच्या अती वापरामुळे हिंसक घटनांचा क्रम वाढत आहे. सत्तेच्या प्राप्तीमुळे राजनीतीला समाजविकासांच्या साधनांचे

आणि मार्गांच्या शुद्धीतेचे भान राहत नाही. ते सर्व मनमानी कारभार करतात. त्यामध्ये मग विरोधी गट असो किंवा सत्ताधारी गट असो ते कोणत्याही विवेकाची मर्यादा पाळत नाहीत. त्याविषयी दादा धर्माधिकारी म्हणतात, "विरोधी व्यक्ती आणि पक्ष एकदुसऱ्यावर दगाबाजी, गुंडशाही आणि वाईट कार्यांचा आरोप करतात." (धर्माधिकारी दादा (२००५)९४). या आरोप प्रत्यारोपामध्ये काही प्रमाणात सत्य, असत्याचा अंश असतो. वास्तविक पाहता निवडणूकामध्ये गुंडशाहीचा उपयोग हा कमी-जास्त प्रमाणात होतो. त्यामुळे गांधींच्या सत्य, अहिंसा मूल्यांचा अवलंब राजनीतीत होत नाही असे स्पष्ट होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जनतेच्या विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून नागरिकांना स्वातंत्र्यांचा अधिकार बहाल केला गेला. आणि समाजाच्या स्वयंपूर्णतेच्या दृष्टिने वाटचालीचा विचार केला. त्यातून उलट मार्गाचा अवलंब केला तो म्हणजे कार्यकारी मंडळ फक्त कायदेमंडळाला जबाबदार असते. ते जनतेला जबाबदार नसते. त्यामुळे ते नागरिकांच्या प्रती उत्तरादायित्त्व दाखवत नाही. याबाबत दादांचे असे मत आहे की, "या देशात राष्ट्रनीती ही नाही आणि लोकनीती ही नाही. सर्वत्र राजनीती आहे. आणि ती सत्तावादी राजनीती आहे." (धर्माधिकारी दादा (२००५)३६०). राजनीतीमधील प्रशासन व प्रतिनिधी मूठभर सत्ताधारी व्यक्तींच्या मालकी हक्काचे संरक्षण करतात. अशारितीने दादा धर्माधिकारी यांनी राजनीतीमधील अनेक दोष दाखवले आहेत.

**सद्यःकालीन लोकशाहिची परिस्थिती :**

आजच्या लोकशाहीत अनेक दोष उणिवा निर्माण झाल्या आहेत. तेव्हा त्यामधील दोषांचे निराकरण करण्यासाठी तिच्यात मूलभूत बदल करणे आवश्यक आहेत. आज जी लोकशाही अस्तित्त्वात आहे. या लोकशाहीचा जन्म भांडवलशाहीच्या उदरात झाला आहे. ती एक सावकारच्या कन्येच्या रूपात आहे. ती खूप महाग असल्याने तिचा स्वीकार करणे अवघड आहे. या सावकार कन्येचा संपूर्ण संदर्भ बदलणे गरजेचे आहे. त्यानंतर तिचा स्वीकार समाजाच्या विकासाच्या दृष्टिने होवू शकतो. बाजारात ज्यांना मोबदला किंवा

किंमत मिळत नाही तो गुण, ती शक्ती, किंवा ती कला फुकट आहे. ही भांडवलशाहीतील पद्धत लोकशाहीने अनुकरली आहे. त्यामुळे भांडवलशाही प्रमाणेच आजच्या लोकशाहीला बाजारी स्वरूप प्राप्त झाले आहे असे दिसते. या विषयी दादांनी पुढील विवेचन केले आहे. "मताच्या बदल्यात पैसा हा संदर्भाचा परिणाम आहे. लोक एकमेकांना म्हणतात, तो अमुक मनुष्य निवडून आला कारण त्याने पाण्यासारख पैसा ओतला. दुसरा म्हणतो त्याने दमदाटी करून मते बळकावली, काही माणसे मते विकत घेवू शकतात. काही माणसे मते बळकावू शकतात. म्हणून लोकशाही विकत घेतली जावू शकते. आणि बळकावलीही जावू शकते. या लोकशाहीच्या सावकारकन्ये प्रमाणे विक्रय होवू शकतो आणि राजकन्येप्रमाणे अपहरणही होवू शकते. हा संदर्भ बदलल्यावाचून लोकशाही वास्तविक येणार नाही. ती औपचारिक लोकशाही राहील." (धर्माधिकारी दादा (१९९८)१९९). वास्तविक लोकशाही येण्यासाठी अंतर बाह्य परिस्थितीत बदल करणे आवश्यक आहे.

खऱ्या लोकशाहीच्या स्थापनेसाठी बाह्य परिस्थितीमध्ये बदल करावे लागतील असे स्पष्ट होते. या वेळी आपले मत स्पष्ट करताना दादा म्हणतात, "आर्थिक आणि राजकीय प्रश्नांची दृष्टी बदलणे, संप्रदायवाद आणि जातीवाद यांचे निराकरण करणे हे लोकशाहीला आवश्यक आहे." (धर्माधिकारी दादा) (१९९८)२३६). आजची लोकशाही अंतरबाह्य व मूलभूत स्वरूपात बदलणे गरजेचे आहे. दादांच्या मते, "लोकसत्ता असलेल्या देशामध्ये ही लोकशाहीचा लिलाव होवू शकतो. कारण संदर्भ भांडवलशाहीचा असतो. आज लोकशाही असणाऱ्या देशामध्ये प्रतिनिधीत्त्व मिळणे महागडे होवून बसले आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)९९). लोकशाही असणाऱ्या देशात संसदेच्या प्रतिनिधित्त्वाला बाजारी स्वरूप प्राप्त झाले आहे. म्हणजेच प्रतिनिधित्त्वाच्या लिलाव भरवला जातो. जास्त बोली करणाऱ्याला प्रतिनिधित्त्व मिळत असते. त्यामुळे तेथे पैशावर चाललेली लोकशाही असे स्वरूप दिसते. यावरून लोकशाही ही भांडवलशाहीचे अपत्य असल्याचे निष्पन्न होते.

लोकशाहीचा संदर्भ परिवर्तीत करण्यासाठी कोणत्याही दंडशक्तीचा, सत्ताशक्तीचा किंवा विधीनियमांचा वापर केला जात नाही. कारण लोकशाही शासन व्यवस्थेचा कायदा निर्मितीची प्रक्रिया ही कागदावर होत असते. तेव्हा परिस्थितीचा संदर्भ बदलण्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी एक शक्ती सांगितली आहे. ती म्हणजे, "ती शक्ती अहिंसक असू शकते. तिच्या पासून आपण लोकशाहीचा संदर्भ बदलू शकतो. लोकशाहीचा संदर्भ ही बदलता पाहिजे. आणि पाया ही बदलला पाहिजे. ह्या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी झाल्या पाहिजेत." (धर्माधिकारी दादा (१९९८)२००). लोकशाहीचा संदर्भ आणि पाया बदलण्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी अहिंसक लोकक्रांतीची गरज आहे असे प्रतिपादन केले आहे. कारण त्यातूनच लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्त्यांची निर्मिती होत असते. सत्ता, संपत्ती व शस्त्र, निरपेक्ष सर्वसामान्य नागरिकांच्या राजकीय क्षेत्रातील स्वातंत्र्याची परिणती लोकशाहीच्या संदर्भात म्हणजे आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यात व्हावी अशी दादा धर्माधिकारींची अपेक्षा होती. ते म्हणतात, "त्यासाठी सामान्य माणूसही तेजस्वी व सामर्थ्यवान असला तरच आपण लोकशाहीचा पाया रचू शकू." (धर्माधिकारी तारा (१९९९)७३).

भारतीय लोकशाहीत पक्षनिष्ठेला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रत्येकजण आपल्या आपल्या पक्षाचा पक्षाभिमान जपण्याचा प्रयत्न करत असतो. यातून पक्षांना अधिक श्रेष्ठ स्थान प्राप्त होते. लोकशाहीच्या जागी उमेदवारशाही आपले बस्तान बसवत आहे असे दिसते. याबद्दल दादा म्हणतात, "प्रत्येक नागरिक हा आजच्या लोकशाहीचा उमेदवार आहे. आणि दोन उमेदवार एकमेकांना अनुकुल कधीच राहू शकत नाही. दुकानदार आणि गिऱ्हाईक यांच्या हित संबंधाप्रमाणे दोन उमेदवारांचे हितसंबंध एक नाहीत. त्या लोकशाहीत नागरिकांचा परस्पर विश्वास आणि प्रतिष्ठा वाढू शकत नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)२००). लोकशाहीत उमेदवार आणि नागरिक यांचे संबंध बदलून लोकशाहीला तिच्या बाजारी स्वरूपापासून वाचवले पाहिजे. यासाठी सर्वांच्या

सहयोगाची गरज आहे. दादांची अशी भूमिका आहे की, याबाबत दादांची अशी भूमिका आहे की, "लोकहित दगडाचे आणि पक्ष मात्र सोन्याचा आहे. हे आजच्या लोकशाहीचे स्वरूप आहे. त्यामुळे तिचा पाया बदलल्या खेरीज मानवीय मूल्यांची स्थापना होणार नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)२०३).

सर्वोदय समाजामध्ये शेजाऱ्यावर जसे प्रेम केले जाते तसे लोकशाहीत शत्रूवर प्रेम करावे म्हणजे लोकशाहीतील आजचा विरोधक हा उद्याचा स्वपक्षीय बनू शकेल. त्यामुळे समाजात विरोधक राहणार नाही. सत्तेसाठी प्रतिनिधीत्त्व राहणार नाही व यातून जयपराजयाची वृत्ती गौण होईल. याविषयी दादांचे विवेचन महत्त्वाचे ठरते ते, "उमेदवारी गेली, दुसऱ्याला प्रतिपक्षी बनवण्याची प्रवृत्ती गेली म्हणजे आजच्या लोकशाहीला जे स्वरूप प्राप्त झाले त्यास राजनीती न म्हणता लोकनीती म्हणावे असा आजचा विचार आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)२००). ज्याच्याजवळ संपत्ती, धन आहे तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करतो. ज्यांच्याजवळ सत्ता आहे तो लोकशाहीला आपल्या स्वार्थासाठी राबवून वळवण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा यापासून लोकशाहीला बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो. लोकशाहीला बाहेर काढण्यासाठी प्रतिनिधी ऐवजी नागरिकांची सत्ता आवश्यक आहे. लोकसत्ता आणि लोकशक्तीचा आचार लोकशाहीला देणे गरजेचे आहे. यातून गुणात्मक लोकशाही निर्माण होईल. तेव्हाच गांधीना अभिप्रेत असणारे रामराज्य येवू शकेल अशी भूमिका दादांनी विशद केली आहे.

मानवाला सत्तेची प्राप्ती झाली की, कर्तव्याच्या विसर पडतो. तो आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करून फक्त आपल्या स्वार्थासाठी अधिकाराचा उपयोग करून घेतो. त्यामुळे समाजाच्या विकासाला वेग मिळत नाही. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या अधिकारापेक्षा कर्तव्याला अग्रस्थान दिले पाहिजे. सर्वोदयाचे प्रवर्तक म्हणतात, "अधिकाराने वाद माजतो. कर्तव्याने वाद नाहीसा होतो. नागरिकांमधला वाद नाहीसा करायचा असेल तर कर्तव्यावर जोर दिला पाहिजे. नागरिक-नागरिकांनी परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावे यादृष्टिने मनुष्याच्या कर्तव्याचा विचार करण्यात

यावा." (धर्माधिकारी दादा (१९९८)२०५). प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याचा विचार करावा आणि दुसऱ्याच्या अधिकराचाही विचार करावा. आपल्या अधिकाराला गौण स्थान देवून दुसऱ्याच्या अधिकाराला प्राधान्य द्यावे. त्यामुळे राजकारणात असणारे मुत्सदिगिरी, हेवेदावेपणा यांची जी कल्पना आहे ती सर्व बदलेल. कोणतेही कार्य कर्तव्यातून केल्यास ते अधिक समजून येते. सर्वोदयात लोकशाहीचा मूळ सिद्धांत सांगताना दादा म्हणतात, "कर्तव्य माणसाचे सत्ता भगवंताची" (धर्माधिकारी दादा (१९९८) २०५). म्हणजेच दादांच्या सर्वोदय विचाराच्या पायाशी गांधींच्या रामराज्याची संकल्पना होती हे दिसते. सर्वोदयाच्या दृष्टिने लोकशाहीचा पाया दादा धर्माधिकारी सांगतात की, "रामराज्य म्हणजे भगवंताचे अधिष्ठान, कर्तव्याचा विचार माणसाने करावा. सत्ता भगवंताची, असे सगळ्या नागरिकांनी मिळून मानावे हा सर्वोदयाच्या दृष्टिने लोकशाहीचा पाया आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८) २०५). त्यामुळे समाजात कसलीही स्पर्धा, प्रतिस्पर्धा राहणार नाही. विरोध जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात असणारे अधिकाराचे भांडण कर्तव्यात परिर्वतीत होते. त्यातून ईर्षा, द्वेष नाहीसा होतो. आणि हाच बदल लोकशाहीचा पाया बदलण्यासाठी नागरिकांच्या कर्तव्यभावनेचा विकास करतो. म्हणून दादा धर्माधिकारीनी लोकशाहीच्या सद्य:परिस्थितीचा विचार करून जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी जनतेच्या संम्मतीवर आधारित लोकनीतीची स्थापना करण्याचा संकल्प मांडला आहे.

**लोकनीती :**

दादा धर्माधिकारी यांनी विनोबा भावे यांच्या लोकनीतीच्या विचारांचा परामर्श घेवून राजनीतीच्या विचारांची चिकित्सा केली. राजनीतीचा विचार हा समाजाच्या विकासाचा नाही. तर तो राज्यकर्त्यांच्या विकासाचा आहे. अशा अनेक उणिवा राजनीतीमध्ये होत्या म्हणून दादांना संपूर्ण समाजाचा विकास करण्याच्या हेतूने संपूर्ण मानवाच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या नीतीचा विचार मांडला तो म्हणजे 'लोकनीती' होय. वास्तविक पाहता त्यांनी विनोबा भावेंच्या लोकनीतीच्या विचारांना चालना देवून त्यांचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला.

**'लोक' या शब्दाचा अर्थ :**

'लोकनीती' हा शब्द 'लोक' आणि 'नीती' या दोन शब्दापासून तयार झाला आहे. वॉल्टर लिपमन यांनी 'दि पिपल ऑफ फिलासॉफी' (लोक-दर्शन) असा 'लोक' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे. म्हणजे लोकांचा आचार, विचार आणि लोकांच्यात परस्पर असणारा संबंध होय. याचबरोबर शंकराचार्यांनी 'लोक्यते इति लोक' असा 'लोक' शब्दाचा अर्थ घेतला आहे. म्हणजे जो दिसत आहे आणि जो बघणारा आहे. हे दोघेही लोक आहेत. दादा धर्माधिकारी 'लोक' हा शब्द 'लोकनीती' या अर्थाने घेतला आहे.

**दादा धर्माधिकारींचा लोकनीतीचा विचार :**

दादा लोकनीतीची व्याख्या करताना म्हणतात, "लोकसत्तेचा विचार ज्या नीतीमध्ये येतो आणि त्या लोकसत्तेचा जी नीती आधारभुत असते त्यास लोकनीती म्हणतात." (धर्माधिकारी दादा (१९९९) ११६). त्यांनी लोकनीतीच्या विचारांची सुरूवात मानवाच्या स्वातंत्र्यापासून केली आहे. सदस्यत्त्व आणि नागरिकत्त्व या दोन्हीमधून लोकनीतीचा विकास व जनतेच्या मर्जीतून लोकनीतीचा विचार होईल असा यांना विश्वास वाटत होता. लोकनीतीमध्ये व्यक्ती ही केंद्रस्थानी असते. म्हणून व्यक्तींच्या विकासासाठीच लोकनीतीची स्थापना व्हावी असे त्यांचे मत आहे. लोकनीतीला आधार हा संपूर्ण समाजाचा आधार आहे. दादा लोकनीतीच्या विचाराची भूमिका घेतात की, "लोकनीती मध्ये मनुष्य निरपेक्ष मूल्य आहे आणि निरपेक्ष मूल्याचा अर्थ आहे. अन्य कोणत्याही प्रकारचे अंतर आणि गुण-दोष यांची अपेक्षा न करता गुण-दोष निरपेक्ष रूपातून मानवाचे मूल्यांकन केले पाहिजे. मनुष्याची किंमत मनुष्याच्या नात्याने व्हावी त्यांच्यात त्यांची प्रतिष्ठा ही त्यांची निरपेक्ष प्रतिष्ठा राहील लोकनीती हेच सारतत्त्व आहे." (धर्माधिकारी दादा (२००५) ६४१). मानवाला लोकनीतीमध्ये मानवतेची वागणूक दिली जाईल त्यामुळे त्यांची मान-प्रतिष्ठा अबाधित राहिल. मनुष्यावरील राज्यसत्तेचे नियंत्रण कमीत-कमी करून वस्तूवरील नियंत्रण वाढवले जाईल. जेणेकरून व्यक्तीचे विचार स्वातंत्र्य

आणि कर्म स्वातंत्र्य यांचा संकोच न होता त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहिल. त्यामधून व्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यक्ती विकास होईल.

लोकनीतीत सत्तेच्या किंवा इतर कोणत्याही मतभेदाला स्थान असणार नाही. दादा धर्माधिकारी म्हणतात, "लोकनीती सत्ता विरोधी नाही. सत्तेवर बहिष्कार ही टाकत नाही. लोकांची सत्ता, निरपेक्ष लोकचारित्र्यावर आधारित आहे. सत्ता निरपेक्ष ही एक स्वतंत्र भावरूप कल्पना आहे. नागरिकांच्या चारित्र्याचा तो आधारभूत सिद्धांत आहे." (धर्माधिकारी दादा (२००३) ५२८). लोकांची सत्ता आणि मनुष्यामध्ये जी व्यक्ती निरपेक्ष सत्ता असते. त्यांना लोकनीतीचा आधार मानले जाते. लोकनीतीचा आधार मनुष्याची अशी विशेषता असते त्यामध्ये बुद्धीला शक्ती मानली जाते. सत्तेचा उपयोग व्यक्तीमध्ये लपलेल्या पशुता व दानवता यावर न होता मनुष्याच्या आधारावर होईल असे स्पष्ट होते.

लोकनीतीची सुरूवात प्रत्येकाने स्वतःवर नियंत्रण ठेवण्यातून केली पाहिजे. त्यामुळे समाजाच्या हिताचा हेतू साध्य होईल. प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या व्यवहारावर नियंत्रण करेल. लोकनीती अशी नीती आहे की, जिच्या अनुषंगाने प्रत्येक मनुष्याने समाजात आपल्या जीवनाचे नियमन केले पाहिजे, नियंत्रण केले पाहिजे. लोकनीतीचा हेतू समाजकल्याणाचा असल्याने समाज कल्याणासाठी प्रत्येकाने आपल्या जीवनाचे नियंत्रण करणे गरजेचे आहे. राज्यविहिन समाजरचना निर्माण करण्यासाठी प्रथम समाजात लोकनीतीची स्थापना प्रत्येकाने आपल्यापासून केली पाहिजे. आपल्या मनावर आपले नियंत्रण असल्यास इतरांचे विचार आपल्याला पटतात. यातून सर्वोदय समाजव्यवस्था निर्माण होईल असे दादांचे मत आहे. लोकनीतीच्या स्थापनेसाठी जाती-निराकरण, संप्रदाय-निराकरण, वर्ग-निराकरण यांची आवश्यकता आहे. जोपर्यंत ह्या तिन्ही गोष्टी साध्य होत नाहीत तोपर्यंत लोकनीतीची स्थापना होणार नाही. त्यासाठी समाजातील समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

ज्यावेळी उत्पादनाची साधने ही समाजाच्या मालकीची होतील त्यावेळी मालकी हक्काचे निराकरण होईल व त्यातूनच लोकशाहीचा संदर्भ आणि पाया बदलेल आणि तो लोकनीतीकडे वळेल. त्यातून अशा स्वयंपूर्ण समाजाची निर्मिती होईल ज्यामध्ये प्रशासनाची जागा अनुशासन घेईल व व्यक्ती ऐवजी वस्तूवरिल नियंत्रण वाढेल. यासाठी दादांनी लोकनीतीमध्ये सत्तेचा उपयोग सांगितला आहे तो पुढीलप्रमाणे.

"१) सत्ता ही समाज व्यवस्थेचे साधन आहे.

२) सत्ता समाज कल्याणाचे साधन आहे.

३) ज्यांच्यावर खासकरून भर दिला गेला. ती सत्ता समाज परिवर्तनाच्या क्रांतीचे साधन आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)४७).

लोकनीतीमध्ये लोकसत्ता, लोकराज्य आणि लोकशाही या संकल्पनांचा समावेश होतो. विशेषतः लोकसत्तेत लोकनीतीचा अंतर्भाव होतो. दादांच्या मते, "प्रातिनिधीक लोकशाही वेगळी वस्तू आहे. प्रातिनिधिक लोकसत्ता जेव्हा लोकनीतीस अनुरूप होते. तेव्हा ती लोकनीतीच्या अनुशंगाने चालते. तोपर्यंत ती यर्थात लोकसत्ता असते." (धर्माधिकारी दादा (२००३)५०५). जनतेची सत्ता ही लोकनीतीचा आधार असते. लोकसत्तेत प्रेम, दया, करूणा, ममता यामधून सत्ता प्रकट होते. कोणत्याही दंडशक्तीचे जनतेवर नियंत्रण नसते. म्हणून या जनतेच्या राज्यास लोकराज्य म्हणतात. लोकराज्य म्हणजेच लोकनीती होय.

विश्वनागरिकत्त्वाची संकल्पना मांडताना दादा म्हणतात, लोकनीतीला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्राच्या सीमा नष्ट होणे गरजेचे आहे. प्रत्येक राष्ट्राने आपल्या राष्ट्रातील इतर देशातील नागरिकांना नागरिकत्त्व दिल्यास त्यातूनच विश्वनागरिकत्त्वाची संकल्पना प्रत्यक्षात येईल व विश्वराज्य कुटुंब निर्माण होवून लोक विश्वाचे नागरिक बनतील असा लोकनीतीचा विश्वव्यापी विचार दादांनी मांडला आहे.

**अहिंसक संघटन :**

माणूस समाजशील प्राणी आहे. त्यामुळे तो समूहाने राहणे पसंत करतो. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवाच्या समाजशील वृत्तीतून अनेक लहान-मोठ्या संघटना निर्माण केल्या आहेत. या संस्था, संघटनामधूनच समाजाची निर्मिती झाली आहे. त्या समाजातून मानवी विकासासाठी पोषक वातावरण मिळू लागले. परंतू समाजात अनेक समूहाचे लोक राहत असल्याने त्यानी आप-आपल्या समाजातील लोकांच्या विकासासाठी प्रयत्न केले. विकासाच्या दृष्टिने समाजात संघर्ष, मतभेद निर्माण होवू लागले, यासाठी त्यांनी हिंसेचा मार्ग अवलंबला आहे. या संदर्भात विनोबांनी समाजात असणाऱ्या संघटना संविधाननिष्ठ, दंडनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ असल्या तरी तेथे हिंसेचे वापर केला जात होता असे विवेचन केले आहे. अशा संस्था, संघटना समाजाच्या प्रगतीच्या सिद्धांतास प्रतिकूल असतात.

संघटनेत जेव्हा शक्तीचा आधार घेतला जातो तेव्हा संघटन व्यक्तीनिष्ठ विधानात्मक आणि सत्तानिष्ठ बनते. दादा धर्माधिकारींच्या मते, "संघटनेचा आधार नैतिकतेचा असावा आणि नैतिकतेमध्ये जेवढे अनुशासन असेल ते एक-दुसऱ्याचा स्नेह आणि विकासाच्या कारणाने असेल." (धर्माधिकारी दादा (२००२) १९२). समाजातील नैतिकतेच्या आधारावर असणाऱ्या संघटनेत मानवा-मानवामध्ये परस्पर संबंध गरजेचे आहे. कारण प्रत्येकजण फक्त स्वत:च्या विकासाचा विचार न करता सर्वांच्या विकासाचा विचार करतो. यावरूनच मानवाच्या विकासासाठी संघटनेची आवश्यकताअसल्याचे दिसते. दादांची संघटने विषयीची प्रेरणा ही मनुष्याच्या एक-दुसऱ्याबरोबर राहण्याच्या वृत्तीतून निर्माण होते. त्यातूनच संघटनेस स्थायी रूप प्राप्त होते. यावरूनच त्यांनी अहिंसक संघटनेचा विचार मांडला.

औपचारिक संघटना ही समाजाला दाखवण्यापूरती असते. त्यातून कोणत्याही प्रकारचा मूलभूत विकास साधला जात नाही. म्हणून दादांनी समाजातील औपचारिक

संघटना कमीत-कमी प्रमाणात ठेवून अहिंसक संघटनेत सेवाप्रधान संघटनांचा समावेश केला आहे. ते सेवाप्रधान संघटनेचा अर्थ असा सांगतात की, "ते संघटन आपत्ती आणि संकटाच्या शोधात असते." (धर्माधिकारी दादा (२००२)५२०). समाजात असणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सेवाप्रधान संघटनेची आवश्यकता असते. म्हणून अहिंसक संघटनेत सेवाप्रधान संघटनेला महत्त्व आहे. यातूनच सहजीवनाचा पाया मजबूत होतो. अहिंसक संघटनेने सहयोगी असावे पण प्रतियोगात्मक नसावे म्हणजेच संघटनेचा उद्देश सहयोगात्मक असावा. सेवाप्रधान अहिंसक संघटनेची प्रेरणा प्रेम, स्नेह असल्याने त्यामध्ये संविधान, प्रशासन यांना स्थान नाही. असा विचार मांडून त्यांनी संघटनेसाठी सहयोगाला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

अहिंसक संघटनेमध्ये समाजातील सर्व लोकांचे परस्पर स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येकाच्या सहकार्याची गरज आहे. यामधूनच सर्वोदय समाजात अहिंसक संघटनेचा विचार मांडला आहे. त्यामध्ये कोणा एका व्यक्तीचा विचार न करता सर्व व्यक्तींचा विचार केला जातो. या विचारातून दादांनी अहिंसक संघटनेची स्थापना मानवी विकासासाठी केली. त्यामुळे वास्तवतः सर्वोदयाच्या अहिंसक संघटनेचे स्वरूप मानवकेंद्रित आहे असे दादांचे मत आहे. यावरून अहिंसक संघटना व्यक्तीनिष्ठ नसून मानवनिष्ठ असल्याचे स्पष्ट होते.

**मानव केंद्रित अहिंसक संघटन :**

मनुष्य हा समाजाचा केंद्रबिंदू असल्याने अहिंसक संघटनेमध्ये मानवाला केंद्रस्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे अहिंसक संघटन हे मानवकेंद्रित संघटन बनले आहे. मानवकेंद्रित अहिंसक संघटनेत न्यायालय, तुरूंग, सैनिक यांचा समाजासाठी असणारा उपयोग कमीत-कमी प्रमाणात केला जातो. कारण अहिंसक संघटना कोणाच्या दबावाखाली, नियंत्रणाखाली राहत नाही. ती सत्तानिरपेक्ष आणि दंडनिरपेक्ष असते. संघटनेत मानवावर काही प्रमाणात मर्यादा येतात पण त्यांच्या विकासावर नाही. अहिंसक

संघटनेचा मुख्य हेतू मानवाचा विकास साधणे हा आहे. संघटनेत मानवी विकासविरोधी असणाऱ्या घटकात बदल करून मानवी विकासासाठी आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. अहिंसक संघटनेचा मुख्य उद्देश मनुष्याला समाजात ज्या आधारावर प्रतिष्ठा मिळते त्या आधारात अमुलाग्र बदल केला पाहिजे हा उद्देश दादांनी मांडला आहे.

अहिसंक संघटनेबद्दल दादांनी असे विवेचन केले आहे की, "संघटनेमध्ये ज्या व्यक्ती असतील त्याचा एकाचा दुसऱ्याशी संबंध असेल. प्रत्येक व्यक्ती केंद्र असेल तसेच प्रत्येक व्यक्ती परिघ असेल. त्यामध्ये केंद्र आणि परिघ ही व्यक्ती असेल अशा प्रकारे मानवप्रधान संघटन असेल." (धर्माधिकारी दादा (२००२)५२६). मानवकेंद्रित संघटनेमध्ये साध्य आणि साधन या दोन्हीची भूमिका व्यक्तीलाच संभाळावी लागते. या संघटनेमध्ये संपूर्ण समाज नेतृत्त्व करत असतो. वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंतच्या विकासासाठी सर्वोदयाची स्थापना करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे सर्वोदय ही विशिष्ट समाजाची संघटना नसून विश्वव्यापी संघटना आहे आणि तिचे स्वरूपही विश्वकल्याणाचे आहे हे स्पष्ट होते. दादांनी अहिंसक संघटनेद्वारे साऱ्या विश्वाला कुटुंब बनविण्याचा प्रयत्न केला आहे. अहिंसक संघटनेतील सर्वजण एकसंघ जीवन जगतील असा त्यांचा विश्वास होता. म्हणून सर्वोदय समाजासाठी मानवकेंद्रित अहिंसेची गरज प्रतिपादन केली आहे. या मानवाभिमुख संघटनेत मैत्री, स्वातंत्र्य, समानता यांचा समावेश केला आहे.

**अ ) मैत्री :**

समाजात निर्माण होणारी मैत्री ही व्यक्तीच्या परस्पर सहयोगातून निर्माण होते. समान विचार, आदर, एक-दोघांचे विचार एकमेकांना पटणे व एकमेकांना समजून घेण्याची भावना निर्माण होते यामधूनच मैत्रीचा खरा प्रवास होतो. समाजात मैत्रीच्या आधारावर संघटित होवून संघटना निर्माण होते. अहिंसक संघटनेत मनुष्याच्या मैत्रित अहिंसेचे तत्त्व असते. दादा धर्माधिकारींच्या मते, "शुद्ध मैत्रीमध्ये सर्व बहूमोल नाती एकत्र होऊन विलिन होतात." (पुष्पिता (१९९९)५४). अशी ही अहिंसक मैत्रीची संघटना आहे असे स्पष्ट होते.

मित्रत्त्वाची आकांक्षा ही मानवी स्वभावाची मूळ आंकाक्षा आहे. मैत्री ही जाणीवपूर्वक आणि योगायोगाने घडते. दादांच्या मते, "सामाजिक प्रेरणा आणि मानवीय प्रेरणा ह्या मैत्रीच्या प्रेरणा आहेत." (धर्माधिकारी दादा (२००३)५३). समाजाच्या विकासासाठी मानवतेच्या मूल्यरचनेतून निर्माण झालेली अहिंसक संघटना मैत्रीची असते. मैत्री ही जीवनातील अध्यात्मिक मूल्य असल्याने समाजातील स्वार्थी, क्रुर, कपटी लोकांच्यात बदल करण्यासाठी मैत्रिचा मार्ग योग्यतेचा आहे. मैत्रीच्या विकासाचे परिवर्तन हे समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. समाजामध्ये असणारे रक्तसंबंध, यौन संबंध, विवाह संबंध यापेक्षा जो संबंध घनिष्ठ असतो तो म्हणजे मैत्री, असे दिसून येते. मानवाची अनेक बहुमोल नाती मैत्रीमध्ये विलिन होऊन ती पवित्र होतात. दादांनी मैत्रीबद्दल असे विवेचन केले आहे की, "मैत्री एक दिव्य रसायन आहे. त्यामध्ये सैनिकांचे ज्वलन होते, शासनाचे ज्वलन होते, सावकारीचे ज्वलन होते. शेवटी सेवकाचेही ज्वलन होते. हे सर्व ज्याच्यात विलिन होतात त्याचे नाव मैत्री आहे." (धर्माधिकारी दादा (२००३)५५६). समाजात असणारे कोणतेच दोष मैत्रित राहत नाहीत. मैत्रीत कोणत्याही प्रकारची जात, धर्म, वर्ण, वर्ग, लिंग, प्रांत यांच्या भेदभावाची भावना न ठेवता निव्वळ मैत्री होवू शकते.

**ब ) स्वातंत्र्य :**

व्यक्तीला जेवढया जास्त प्रमाणात स्वातंत्र्य उपभोगता येते, तेवढ्याच जास्त त्याचा विकास होतो. स्वातंत्र्य असणाऱ्या समाजात दादांनी स्वातंत्र्याचा अर्थ जबाबदारी असा घेतला आहे. स्वातंत्र्यामुळे व्यक्तीला आपल्या कर्तव्याची, जबाबदारीची जाणिव होते. यातून स्वातंत्र्य जबाबदारी असणारा समाज निर्माण होतो. स्वातंत्र्य असणाऱ्या समाजात दंडशक्ती किंवा सक्तीचा उपयोग होत नसल्याने त्या समाजात अहिंसेचे तत्त्व दिसून येते. या अहिंसक समाजात मानव आपल्या विकासासाठी संघटना निर्माण करतो. व्यक्ती जेवढी आपली जबाबदारी दुसऱ्यावर सोपवितो तेवढेच आपले स्वातंत्र्य दुसऱ्याला

बहाल करतो. म्हणून जबाबदार समाजव्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे. उत्तरदायी समाजात माणूस जेवढ्या प्रमाणात स्वातंत्र्याचा उपभोग घेतो तेवढ्याच प्रमाणात तो आपल्या कर्तव्यांशीही बांधील असतो. म्हणून व्यक्तीने मानवी स्वातंत्र्य आबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे.

दादा धर्माधिकारींनी, "पशु जेवढ्या प्रमाणात स्वतंत्र आहे तेवढ्या प्रमाणात मनुष्य स्वतंत्र नाही. एक क्रूर आणि दुसरा भित्रा आहे. क्रूरता ही वीरता नाही. आणि भीतीसुद्धा वीरता नाही यास असभ्य स्वातंत्र्य म्हटले पाहिजे." (धर्माधिकारी दादा (२००२)५९). निरंतन जागृकता ही सभ्य स्वातंत्र्याची किंमत आहे. क्रूर व्यक्तीमध्ये परिवर्तन घडवून त्यांना स्वत: स्वातंत्र्य उपभोगण्यास आणि दुसऱ्याचेही स्वातंत्र्य आबाधित राखण्यास योग्य परिवर्तन हे प्रेम आणि श्रद्धेद्वारे होईल असा दादांचा विश्वास होता. स्वातंत्र्यात सहयोग असतो त्यामुळे मानवाला वाईट कृत्य करण्यापासून परावृत्त केले जाते. दुसऱ्याला स्वातंत्र्य देण्यातून स्वातंत्र्य वाढते आणि सहयोगाची भावना स्वातंत्र्यात निर्माण होते. दादा म्हणतात, "आपण आपले स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्याबरोबर एकवटले तर ते परस्पर समर्पण असते. परस्पर समर्पणातून दोघांचेही स्वातंत्र्य द्विगुणित होते." (धर्माधिकारी दादा (२००२)६०). म्हणून प्रत्येक व्यक्तीने स्वातंत्र्याच्या उपभोगाचा आनंद घेण्यासाठी आपले स्वातंत्र्य दुसऱ्याला उपभोगासाठी द्यावे यातून स्वातंत्र्याचा व उपभोग घेण्याचा आनंद वाढत जातो.

स्वातंत्र्य कमी केले तर मानवाच्या विकासावर समाजाकडून मर्यादा घातल्या असे होते परंतू स्वातंत्र्याचा त्याग हा प्रत्येक व्यक्ती स्वत:चा स्वत: करते. स्वातंत्र्याचा त्याग करण्यासाठी व्यक्तीवर दबाव टाकला जात नाही हेच स्वातंत्र्य कमी करणे आणि स्वातंत्र्याचा त्याग करणे यामध्ये भिन्नत्त्व आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा म्हणून दादा धर्माधिकारी अहिंसक संघटनेच्या स्थापनेची उपयुक्तता मांडली त्यामध्ये स्वातंत्र्याबरोबरच समानतेलाही स्थान दिले.

क ) समानता :

समाजाच्या मूळ पायाभरणीसाठी स्वातंत्र्याबरोबर समानतेचीही गरज असते. समतेशिवाय समाज उभा राहू शकत नाही. प्रत्येक समाजात अनेक जाती, धर्म, वंश, वर्ण भाषा यांचे लोक राहत असतात. त्यांच्यात एकोपा, एकसंघता असावी लागते. त्याशिवाय समाज स्थापन होवू शकत नाही. प्रजासत्ताक संविधानात प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिले आहेत. त्याचबरोबर राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार दिले आहेत. त्यामुळे सर्वच क्षेत्रात समानतेचे तत्त्व दिसून येते. समाजातील विकासापासून वंचित असणारा वर्ग विकासासाठी संघटित होवून हिंसक मार्गाचा अवलंब करत असतो. म्हणूनच समाजाला हिंसेपासून परावृत्त करण्यासाठी समानता असणे आवश्यक आहे. याचबरोबर अहिंसक संघटनेतही समानतेची गरज आहे. सर्वांच्या विकासाच्या दृष्टिने प्रत्येकाला सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दादा धर्माधिकारी अहिंसक संघटनेत समानतेला स्थान देतात. त्यांच्या मते, "आर्थिक, सामाजिक विषमतेच्या परिस्थितीत राजकिय स्वातंत्र्य अबाधित राहत नाही. हा सिद्धांत निरपवाद आहे. या देशात सर्व नागरिकांना विवाह, संपत्ती, विवाह-विच्छेद इत्यादी सर्व वैयक्तीक अधिकाराच्या विषयांना समान अधिकार आहेत." (धर्माधिकारी दादा (२००५)२७४). म्हणजेच समानतेच्या समाजामध्ये स्त्री-पुरूष असा भेदभाव राहणार नाही. सर्वांना समान विकासाची संधी उपलब्ध करून दिली आहे. कारण अहिंसक संघटन सर्वांच्या विकासासाठी करण्याचा प्रयत्न दादांचा होता. म्हणूनच मानवकेंद्रित अहिंसक संघटनेमध्ये मैत्री, स्वातंत्र्य आणि समता यांचा समावेश केला आहे. समानतेच्या तत्त्वात आर्थिक, राजकीय समतेबरोबर स्त्री-पुरूष समानतेसाठी महत्त्व दिले आहे. विशेषतः स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणूकीबद्दल स्त्री-पुरूष समानतेची भूमिका दादा धर्माधिकारी यांनी स्पष्ट केली आहे.

**स्त्री-पुरूष समानता आणि सहजीवन :**

समाज निर्माण होण्यासाठी आणि टिकवण्यासाठी तो समानतेवर अधिष्ठित असणे आवश्यक असते. समाजात स्त्री-पुरूष समानतेवर भर दिला जातो. कारण स्त्री ही राज्याची अर्धी शक्ती असते. त्यामुळे स्त्री-पुरूष दोघांनाही मानवीय नात्याने समानतेची वागणूक मिळणे गरजेचे असते. प्राचीन काळापासून आजपर्यंत स्त्रियांवर अनेक प्रकारे अन्याय, जुलूम होत आहेत तेव्हा या स्त्रियांना अन्यायापासून मुक्त करण्यासाठी दादा धर्माधिकारी यांनी आपल्या विचारातून स्त्री-पुरूष समानता या तत्वाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक देशाच्या संविधानात स्त्री-पूरूष हा भेद न मानण्याची प्रतिज्ञा केली आहे. परंतू वास्तविक परिस्थिती उलट आहे. स्त्रियांना निवडणूकीमध्ये राखीव जागा एवढे सुद्धा प्रतिनिधित्त्व दिले जात नाही. त्यामुळे स्त्रियां विकासापासून वंचित राहिल्या आहेत. त्यांना समानतेची वागणूक मिळाली नाही असे चित्र दिसून येते. प्राचीन काळापासून स्त्रियांचा एक भोगवस्तू म्हणून वापर केला जात आहे. त्यामुळे स्त्रियांकडे मोहीनी, उपभोगी वस्तू म्हणून समाज बघतो आहे. समाजाचा आजही स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. स्त्री-संबंधी प्राचीन आदर्श हे स्त्रियांच्या मानवतेचे नुकसान आणि अपमान करणारे होते. त्यामुळे त्या आदर्शांच्या आधारनिष्ठेतून सहनागरिकत्त्व प्रत्यक्षात येणार नाही असे स्पष्ट होते. असे दादा धर्माधिकारी म्हणतात. काही प्रमाणात आजचाही समाज प्राचीन आदर्शांना धरून चालणारा आहे. तेव्हा स्त्रियांना समानतेची वागणूक मिळण्यासाठी आणि त्यांच्या सहजीवनासाठीच्या स्त्री विकासाला बाधक असणाऱ्या गोष्टींना मूठमाती देणे गरजेचे आहे. त्याशिवाय स्त्रियांना समानतेची वागणूक मिळणार नाही.

आज काही प्रमाणात स्त्रिया स्वतंत्र जीवन जगण्याचा प्रयत्न करत आहेत पण त्याला समाजाकडून मान्यता मिळत नाही. त्यामुळे त्या संरक्षणासाठी पुरूषांचा आधार घेतात. अशी समाजाची दृढ भावना निर्माण झाली आहे. स्त्री ही समाजात सुरक्षित नाही आणि स्वरक्षित सुद्धा नाही. त्यामुळे ती पुरूषाच्या आश्रयाला जाते. स्त्री जोपर्यंत स्वरक्षित

होत नाही तोपर्यंत ती सुरक्षित होत नाही. स्त्रिला सुरक्षित होण्यासाठी प्रथम स्वरक्षित होणे गरजेचे आहे. दादा म्हणतात, "जी स्त्री स्वरक्षित नाही ती सुरक्षित कधीही होणार नाही. स्त्री स्वरक्षित राहण्यासाठी अहिंसा सर्वात अनुकूल आहे. अहिंसा मूलभूत सामाजिक सिद्धांत आहे. आणि तो स्त्रीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वात अनुकूल आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)१८०). अहिंसक सर्वोदय समाजात स्त्री-पुरूष समानतेबरोबर स्त्रियांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करून स्त्री-पुरूष सहजीवनाचा विचार सांगितला आहे. अहिंसा हा स्त्री-पुरूष समानतेसाठी आवश्यक आहे असे म्हणता येईल.

दादा धर्माधिकारी यांनी स्त्री-पुरूष भेदाचे निराकरण करून स्त्रीला नागरिकता प्रदान करण्याचा विचार मांडला आहे. पुरूषाबरोबर स्त्रियांनाही नागरिकत्त्व देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. स्त्रिला नागरिकत्त्वाचा अधिकार मिळाल्यास संपूर्ण समाजरचना बदलेल आणि त्यातून निर्माण होणारा समाज विकासाकडे मार्गक्रमण करेल असा दादांना विश्वास होता. या समाजात स्त्रीची सहधर्मिणीची, सहजीवनीची भूमिका घेईल. त्यामुळे तिचे समाजात असणारे स्थान उंचावेल व स्त्री-पुरूष समानता समाजात रूजेल. स्त्री आणि पुरूषामध्ये सामान्य मनुष्यत्त्व आहे. त्याची व्याप्ती सुद्धा व्यापक आहे. त्यामुळे स्त्री-पुरूष यांच्या नागरिकत्त्वात अंतर असू नये त्यासाठी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान मिळाले पाहिजे. असे दादांचे मत आहे की, "स्त्री आणि पुरूषामध्ये एक सामान्य मनुष्यत्त्व आहे. या सामान्य मनुष्यत्त्वाच्या आधारावर दोन्ही नागरिकत्त्वाची रचना होते." (धर्माधिकारी दादा (२००२) १७९). तसेच ज्या नागरिकत्त्वामध्ये रक्त-संबंध, यौन-संबंध, विवाह-संबंध नसतो तर स्त्री-पुरूष संबंध असतो. त्यातून सहनागरिकत्त्व निर्माण होते असा त्यांचा विचार आहे. स्त्रीला नागरिकत्त्व प्राप्त झाल्यावर समाजात रूढ असणारा मातृत्त्वाचा, पत्नीत्त्वाचा, भगीनीचा आणि मैत्रीणीचा अर्थ बदलेल हेच यातून स्पष्ट होते.

दादांनी स्त्री जीवनात ब्रह्मचर्य असावे असा विचार मांडला आहे. ब्रह्मचर्य हे सामाजिक मूल्य मानले जाते. पुरूषांच्या जीवनामध्ये ब्रह्मचर्य जितके सुप्रतिष्ठित मानले जाते तितकेच स्त्री जीवनातही मानले पाहिजे. कारण स्त्रीच्या नागरिकत्त्वाचा विकास

ब्रह्मचर्यातून होतो स्त्रीला आजपर्यंत समाजामध्ये जे नागरिकत्त्व प्राप्त झाले आहे ते वास्तविक नसून औपचारिक स्वरूपाचे आहे. ते नागरिकत्त्व वास्तविक बनण्यासाठी स्त्री जीवनात ब्रह्मचर्याचा विकास झाला पाहिजे. स्त्री जीवनात ब्रह्मचर्याची मूल्ये ही शैक्षणिक टप्प्यातून रूजली पाहिजेत. म्हणजेच शिक्षण क्षेत्रात असताना मूले आणि मूली यांना कोणत्याही प्रकारची विवाहाची भावना होवू नये. त्यांचे जीवन शिक्षण क्षेत्रात ब्रह्मचर्यनिष्ठ रहावे तेव्हाच मूले आणि मूली यांचा सह-शिक्षणाचा मार्ग यशस्वी होतो. शिक्षण क्षेत्रातील वस्तूपरिवर्तनातून मूल्यपरिवर्तन होते. त्यातूनच दोघांमध्ये सह-नागरिकत्त्व प्रत्ययास येते. यातूनच स्त्रियांची नागरी, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि प्रामुख्याने कौटुंबिक प्रतिष्ठा वाढेल असे वाटते.

काही वेळा स्त्रिया स्त्रियांनाच गौण स्थान देतात तर पुरूषांना श्रेष्ठत्त्व प्रदान करतात. दादा धर्माधिकारी याबद्दल सांगतात की, "बहुतांशी स्त्रीया आपल्या आणि अन्य स्त्रीयांच्या शरीरास अपवित्र मानतात. आपल्या शरीरापेक्षा पुरूषांच्या शरीरास श्रेष्ठ मानतात. स्त्रीच स्त्रीच्या शरीराला हिन मानते. याचा परिणाम म्हणजे स्त्रियांमध्ये असणारी मित्रत्त्वाची, आदराची भावना पुरूषांच्या तुलनेत कमी असते." (धर्माधिकारी दादा (२००२)३७३). स्त्रियांच्या मनात असलेली वाईट प्रवृत्ती नष्ट झाली पाहिजे तर परस्परांबद्दल आदराची भावना असली पाहिजे. स्त्रियांनीच स्त्रियांना पाठींबा दिला पाहिजे. त्यासाठी स्त्रीयांमध्ये सख्य भावना असणे गरजेचे आहे.

स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये एक-दुसऱ्याबरोबर राहण्याची जी प्रबळ इच्छा आणि उत्कंठा असते हा सहजीवनाचा आधार आहे. आणि पुरूषामध्ये एकमेकांबद्दल निर्भयता आणि विशुद्ध स्नेह, प्रेम असल्यास वास्तविक समाजात स्त्री-पुरूष सहजीवनाची स्थापना होवू शकेल. तेव्हा स्त्री आणि पुरूष यांच्या जीवनात वास्तविक आणि विधायक समता येईल. म्हणजेच दोघांच्या जीवनात सुख, आनंद द्विगुणित होवून स्त्रीयांमधील आणि स्त्री-पुरूष परस्परांमधील कुटुंब निरेपक्ष स्नेह आणि विश्वास सहजीवनाचा आधार होवून शकेल. अशा प्रकारे दादांनी स्त्री-पुरूष समानतेतून स्त्री-पुरूष सहजीवनाचा विचार समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला आहे.

१ ) **मानवनिष्ठ अर्थनीती :**

दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदय समाजाच्या माध्यमातून मानवनिष्ठ अर्थनीतीवर दृष्टिक्षेप टाकला आहे. वाढती बेकारी आणि संपत्तीचे केंद्रीकरण यामुळे समाजात विषमता, भेदभाव निर्माण होत चालला आहे. तेव्हा उत्पादन पद्धतीत बदल करून विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा स्वीकार करणे गरजेचे आहे. कौटुंबिक आर्थिक परिस्थितीचा जेव्हा विचार केला जातो त्याच वेळी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचाही विचार केला पाहिजे. कारण आजच्या अर्थशास्त्राचे स्वरूप हे कुटुंबापुरते मर्यादित राहिलेले नसून ते बाजाराचे अर्थशास्त्र झाले आहे. दादा धर्माधिकारी यांनी अर्थशास्त्राचे तीन विभाग सांगितले आहेत. "१) उत्पादन पद्धती आणि वितरण पद्धती. २) उत्पादनाची साधने आणि वितरणाची साधने. ३) उत्पादनाचा संबंध अर्थात उत्पादन आणि वितरण संबंध." (धर्माधिकारी दादा (२००२)३१०). या तिन्ही संबंधातून अर्थशास्त्राची संस्कृती स्पष्ट होते. मानवीय अर्थशास्त्रात उत्पादनाच्या वितरणाची पद्धत समान असणे गरजेचे आहे. त्यातूनच उत्पादक वर्ग आणि उपभोक्ता वर्ग यांचा विकास होवू शकतो. उत्पादनात सहभागी असणाऱ्या श्रमिक वर्गाच्या विकासाचाही सर्वोदयाच्या अर्थशास्त्रात विचार केला जातो.

समाजात असणाऱ्या माणसाचा आणि उत्पादन साधनांचा संबंध हा सांस्कृतिक असतो. मानवनिष्ठ अर्थनीतीमध्ये व्यक्ती केंद्रस्थानी असते. त्यामुळे त्यात तिच्या विकासाचा विचार केला जातो. दादांना असे वाटते की, "सांस्कृतिक परिवर्तन आणि धर्म परिवर्तन इत्यादी बंद झाल्यावर माणसा-माणसामध्ये जो संबंध निर्माण होईल त्या संबंधाच्या निर्मितीची प्रक्रिया अशी असावी की ज्यामध्ये व्यक्ती प्रशिक्षित व्हाव्या, त्यामधून लोकांचे शिक्षण व्हावे अशा प्रकारची उत्पादनाची पद्धती असावी. त्यामध्ये मनुष्याचा विकास आणि व्यक्तित्वाचा विकास होईल." (धर्माधिकारी दादा (२००२)३११). प्रत्येक वस्तूच्या घटकाच्या उत्पादनातून समाजाचा विकास व्हायला

पाहिजे असा सर्वोदय अर्थशास्त्राचा विचार आहे. कारण त्यातूनच व्यक्ती विकासाचा मार्ग निर्माण होत असतो. सर्वोदयाचे अर्थशास्त्र हे मानवनिष्ठ अर्थशास्त्र आहे. वस्तूच्या उत्पादना बरोबरच व्यक्तीत्त्वाचा विकास होणे हे महत्त्वाचे मानले जाते. माणसा-माणसामध्ये असणाऱ्या प्रत्येक संबंधाचा, व्यक्तींच्या कलेचा विकास उत्पादनातून होणे गरजेचे आहे. कारण व्यक्तीमधील या गुणातूनच व्यक्तींच्या बंधूत्त्वाच्या वृत्तीचा विकास होतो. त्यातूनच सर्वोदयाला अभिप्रेत असणारी मानवनिष्ठ अर्थनीती निर्माण होईल आणि याच मानवकेंद्रित अर्थशास्त्राला पुढे विश्वकुटुंबाचे स्वरूप प्रदान होईल असा सर्वोदय अर्थशास्त्राचा दादा धर्माधिकारी यांनी विचार मांडला

अर्थरचना ही व्यक्तीनिष्ठ नसावी तर ती मानवनिष्ठ असावी कारण मानवनिष्ठ अर्थरचनेत कोणाही एकाचा विचार केला जात नाही तर संपूर्ण समाजाच्या विकासाचा विचार केलेला असतो. उत्पादन साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी स्थापन होणे गरजेचे आहे. कारण व्यक्तीमध्ये एक-दुसऱ्याविषयी असणाऱ्या जबाबदारीच्या भावनेतून सुखी समाज निर्माण होवू शकतो. यासाठी व्यक्तीला आपल्या समाजासाठीच्या जबाबदारीची जाणिव होणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्ती जेव्हा सर्वांच्या हिताचा विचार करते तेव्हाच त्यामधून सर्वहित साध्य होते.

आजच्या परिस्थितीत कमी-जास्त प्रमाणात लोकसंख्येचा प्रश्न अनेक राष्ट्रासमोर उभा राहिलेला आहे. तेव्हा त्याच्या उपाययोजनेसाठी संपूर्ण मानवजातीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी व्यक्ती-व्यक्तीमध्ये सहयोगाच्या भावनेची गरज आहे. यामध्ये सृष्टीचा विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग बंधुत्त्वाच्या सहयोगातून सहजीवनाकरिता झाला पाहिजे. प्रामुख्याने विज्ञानाचा प्राथमिक उपयोग निर्वाहाकरिता संयोजन करण्यासाठी आहे. त्यामुळे स्वतःच्या स्वार्थासाठी, वैयक्तिक भोगाकरिता विज्ञानाचा, सृष्टीचा किंवा इतर साधन संपत्तीचा उपयोग करू नये तर दुसऱ्याचे जीवन कसे सुखी समृद्ध करता येईल व तसेच अखिल मानव प्राण्यात

सहजीवन कसे वाढवता येईल यादृष्टिने विचार करणे गरजेचे आहे. याशिवाय लोकसंख्येच्या मूलभूत गरजांचा प्रश्न सुटू शकणार नाही. तेव्हा याच्या उपाययोजनेसाठी प्रत्येकाने आपला स्वार्थ, लोभ बाजूला सारला पाहिजे. दादांचे असे मत आहे की, आज लोकसंख्येचा विचार होतो तो बकासुराच्या पाळीप्रमाणे होतो. बकासुराची वेळ आली तर ती माझ्यावर यावी अशी प्रत्येकाने आपली भूमिका तयार करणे आवश्यक आहे. या वृत्तीतून समाजात स्नेहाची, बंधुत्त्वाची, नैतिकतेची वृत्ती वाढत जाईल. आणि त्यातूनच समाज विकासाचे संयोजन घडून येईल. यातील संयोजनाबाबतच दादा धर्माधिकारी म्हणतात, "हे जे बंधुत्त्वाकरिता संयोजन आहे हा सगळया सर्वोदयाच्या अर्थशास्त्राचा पाया आहे. सर्वोदयाचे अर्थशास्त्र हे फक्त उत्पादकाचे अर्थशास्त्र नाही." (धर्माधिकारी दादा (१९९८)१०७). सर्वोदयाच्या अर्थशास्त्रामध्ये उत्पादकाबरोबरच अनुउत्पादक वर्ग आणि उपभोक्ता वर्गाचा सुद्धा समावेश केलेला आहे. उत्पादनातून प्रत्येक व्यक्तीला म्हणजे सर्वांनाच समान उपभोग, समाधान मिळाले पाहिजे. दादा म्हणतात, "समाजामध्ये उत्पादन सहजीवनाकरिता व्हावे हे वास्तविक सगळयाच अर्थशास्त्राचे साध्य आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)१०८). त्यामुळे सर्वोदयाचे अर्थशास्त्र यशस्वी होण्यासाठी सहयोगात्मक सहजीवनाची आजच्या समाजात गरज आहे. सर्वोदयाच्या अर्थरचनेत जशी व्यक्ती-व्यक्तीमध्ये सहयोगाची भावना असते तशीच व्यक्ती आणि निसर्ग यांच्यामध्ये सहयोगाची भावना निर्माण करण्यासाठी मानवनिष्ठ अर्थरचनेची गरज आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफ्याच्या हेतूने उत्पादन केले जाते. सर्वोदय अर्थव्यवस्थेत व्यक्तींच्या विकासासाठी आणि दुसऱ्यांच्या आवश्यकतेची पूर्तता करण्यासाठी उत्पादन केले जाते. भांडवलशाहीत अतिरिक्त मूल्यांतून मिळणाऱ्या नफ्याचा उपभोग समाजासाठी होत नाही. अतिरिक्त मूल्यातून श्रमाचा क्रय-विक्रय होतो. त्यातून मिळणारे मूल्य कमी-जास्त असते. उत्पादनातून मिळणाऱ्या अतिरिक्त मूल्यातून होणारे उत्पन्न हे समाजासाठी उपयोगात आणले पाहिजे. सर्वोदयात सर्व व्रतांना सामाजिक मूल्यें

मानण्यात आली आहेत. श्रम हे सामाजिक मूल्य असल्याने दादांचे असे मत आहे की, "अतिरिक्त मूल्यातून भांडवलशाहीला अंतविरोध निर्माण झाला यातून वर्गविग्रह आणि वर्गसंघर्ष तयार झाला हे सर्व यांत्रिकिरणाचे परिणाम आहेत." (धर्माधिकारी दादा (२००२)३२२). सर्वोदयाच्या अर्थशास्त्रात पूर्णपणे यंत्राला विरोध केलेला नाही. पण मानवाने यंत्राचे गुलाम होता कामा नये असे म्हटले आहे. उत्पादक आणि श्रमिक असा भेद न मानता दोघांनाही समान प्रतिष्ठेची वागणूक मिळाली पाहिजे. सर्वोदयात श्रमाचा मोबदल्याशी संबंध नसतो. श्रमाला सामाजिक मूल्य प्राप्त झाल्यामुळे काम आणि श्रम यांची तफावत होता कामा नये. दादा धर्माधिकारींच्या मते, "श्रम ही विकण्याची वस्तू नव्हे श्रमाचा दामाशी संबंध नसतो." (धर्माधिकारी दादा (१९९८)१३२). असे सर्वोदयाच्या अर्थशास्त्राचे सूत्र आहे त्यामुळे श्रमाचा दामाशी संबंध येत नाही. समाजाच्या विकासाच्या अर्थशास्त्रातून म्हणजेच मानवनिष्ठ अर्थनीतीतून दादांना सर्वोदय समाजाच्या प्रगतीच्या पाऊलखूणा दिसत होत्या. 'मेहनत माणसाची दौलत भगवंताची' या सर्वोदयाच्या सूत्रानूसार दादा धर्माधिकारी विश्वस्त सिद्धांताचा अवलंब समाजाच्या विकासासाठी करण्याचा प्रयत्न केला.

**ट्रस्टीशिप :**

समाजात मोठ्या प्रमाणात वाढत चाललेला आर्थिक विषमतेच्या निराकरणासाठी गांधीनी विश्वस्त सिद्धांताचा स्वीकार केला. त्यांचा विश्वस्त सिद्धांत म्हणजे, "आपल्या भल्यासाठी समाज जेवढ्यांना मान्यता देईल त्यापेक्षा अधिक मिळकतीच्या खाजगी मालकीचा अधिकार मान्य करत नाही." (मो. क. गांधी, हरिजन, २५/११/१९५२) या सिद्धांताचा प्रत्यय आपल्याला विनोबा भावेंच्या श्रमदान, भूदान आंदोलनातून दिसतो. या गांधी-विनोबा यांच्या विश्वस्त सिद्धांताला अनुसरून आपला ट्रस्टीशिप विचार मांडला आहे. सर्वोदयात सर्वांच्या विकासासाठी ट्रस्टीशिपचा विचार समाजात रूजवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सामान्यतः ट्रस्टीशिप म्हणजे विश्वस्त होय. प्रत्येक व्यक्तीमधील सत्ता

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गाजवण्याची, शोषण करण्याची आणि विशेषकरून सर्व अधिकार उपभोगण्याची लालसा नष्ट झाली पाहिजे. आपल्याजवळ जे आहे ते समाजाला अर्पण केले पाहिजे. त्याच्यावर स्वत:चा मालकी हक्क न गाजवता संपूर्ण समाजाचा मालकी हक्क मान्य केला पाहिजे. अशी भावना वाढीस लागणे गरजेचे आहे. दादा धर्माधिकारींचे असे मत आहे. ज्याच्या जवळ संपत्ती आणि स्वामित्त्व आहे. त्यांनी समाजाचे जबाबदार घटक या नात्याने आपल्या जवळील सर्व साधनसंपत्ती समाजाकडे सुर्पूत केली पाहिजे. संपत्ती समाजाकडे सुपूर्त करण्याच्या 'दान' प्रक्रियेस विनोबा भावेंनी 'प्रत्यार्पण' म्हटले आहे. प्रत्यार्पणाचा अर्थ स्पष्ट करताना दादा सांगतात की, "दान मौलिक दान नाही. प्रत्यार्पण आहे जी वस्तू आम्ही घेतली आहे. ज्या वस्तूचे आम्ही अपहरण केले आहे त्या वस्तूचे आम्ही प्रत्यार्पण करत आहे. याचा अर्थ होतो आज जगात व्यक्ती आणि संस्थांच्या जवळ जेवढी संपत्ती आणि स्वामित्त्व आहे हे सर्व 'न्यास' आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)४४३). न्यास समाजाकडे प्रत्यर्पणासाठी असतो उपभोगासाठी नाही ही कल्पना ट्रस्टीशिपच्या सिद्धांताची मुख्य कल्पना आहे. संपत्ती आणि स्वामित्त्वात असणारी पवित्रता ही ट्रस्टीशिपची मूळ भावना आहे. जर समाजात प्रत्यार्पण होवू शकले नाही तर दादा म्हणतात, "ट्रस्टीशिपमध्ये आम्ही मानले आहे की जेवढी संपत्ती आणि स्वामित्त्व आहे ते न्यास आहे. आणि तो न्यास प्रत्यार्पणासाठी आहे. प्रत्यार्पण केले नाही तर जो अपहरणकर्ता त्याचा परिहरण होईल." (धर्माधिकारी दादा (२००२)४४५).

ट्रस्टीशिप सिद्धांतामध्ये अस्तेय आणि अपरिग्रह ही एकादश व्रत्ये येतात व ती त्याची आधारभूत आहेत. ट्रस्टीशिप संग्रह करू नका असे म्हणत नाही. संग्रह करावा पण तो कोणा एकट्यासाठी नाही. तर संपूर्ण समाजासाठी करावा. ट्रस्टीशिपचा सिद्धांत अंमलात येण्याबाबत दादांचा असा विचार आहे की, "मनुष्य जेव्हा संग्रह करेल आणि तो समजेल की हा संग्रह माझ्या उपयोगासाठी नाही तर समाजासाठी त्याचा उपयोग होईल." (धर्माधिकारी दादा (२००२)४४७). त्यामुळे संपत्तीचा वैयक्तिक मालकीहक्क नष्ट होईल आणि समाजाचा मालकीहक्क प्रस्थापित होईल.

समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ट्रस्टीशिप हे एक साधन आहे. सर्वोदय समाजनिर्मितीसाठी प्रत्यार्पण बरोबरच ट्रस्टीशिपची सुद्धा तेवढीच गरज असते. दादांनी ट्रस्टीशिप हा समाज परिवर्तन आणि समाज धारणेचा सिद्धांत मानला आहे. ट्रस्टीशिपच्या बद्दलची अवलंब करण्यासाठी व्यक्तीमधील संपत्ती आणि स्वामित्त्वाची भावना बदलली पाहिजे. आर्थिक परिस्थितीत बदल झाल्यास ट्रस्टीशिप सिद्धांत प्रत्यक्षात समाजात येवू शकतो. दादा म्हणतात, "ट्रस्टीशिप अनुवंशिक असणार नाही." (धर्माधिकारी दादा (२००२)४४२). वारसा पद्धतीमुळे समाजात असणारा ट्रस्टीशिपचा विचार विकसित होत नाही. त्यामुळे ट्रस्टीशिप ही वैयक्तिक गोष्ट आहे. त्याचा संबंध समाज आणि एकच व्यक्ती असतो. म्हणजे वैयक्तिक असतो. त्यामुळे ट्रस्टीशिपची प्रक्रिया मानवीय वैयक्तिक प्रक्रिया आहे.

सर्वोदय समाजात कोणी मालक किंवा मजूर नसते तर सर्वांच्या सुखासाठी परिश्रम करणारे सर्वच श्रमिक असतात. सर्वोदय हा उत्पादकाचा समाज आहे. तेथे सर्वच उत्पादक असतात आणि सर्वच उपभोक्तेसुद्धा असतात. सर्वजण स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजात प्रतिष्ठेच्या हेतूने वस्तूचे उत्पादन केले जात नाही. तर समाजाच्या विकासासाठी उत्पादन केले जाते. सर्वप्रकारच्या साधन संपत्तीचा मालकी हक्क कोणा एकाकडे न राहता समाजकडे रहावा. त्यातूनच सर्वांना समान विकासाची संधी उपलब्ध होईल आणि सर्वांगीण विकासाचा उद्देश साध्य होईल असा दादा धर्माधिकारींना विश्वास वाटत होता. म्हणून त्यांनी ट्रस्टीशिपचा विचार समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रमाणे सहयोगात्मक प्रतिकाराचाही विचार दादांनी मांडला आहे.

**सहयोग व प्रतिकार किंवा सहयोगात्मक प्रतिकार :**

गांधी यांनी सामुदायिक प्रार्थनेचा प्रथम प्रयोग आश्रमात केला. सामुदायिक प्रार्थनेमधून मानवाची वाईट मनोवृत्ती बदलण्याचा आणि व्यापक भावना निर्माण

करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. वास्तविक पाहता सामुदायिक प्रार्थनेचा अर्थ व्यापकता हा आहे. समाजात लोकांकडून अनेक प्रकारच्या प्रार्थना असतात परंतू त्या सर्व प्रार्थनांमध्ये व्यापकता असते असे नाही. दादा धर्माधिकारी म्हणतात, ज्या प्रार्थनेत सर्व सामिल होतील, ज्यामध्ये परस्पर स्वार्थी भावना असणारे लोक सुद्धा सामिल असतात ती प्रार्थना सामुदायिक प्रार्थना होय. सामुदायिक प्रार्थनेत कोणताही भेदभाव न मानता सर्वांना सहभागी करून घेतले जाते. तसेच परस्पर विरोधी व्यक्तींनाही तेथे सामील करून घेतले जाते. सामुदायिक प्रार्थनेत सर्वांना समान स्थान असते. दादांच्या मते, "सह-प्रार्थनेत सम-प्रार्थनाही व सामान्यांचे हितसंबंधाचे एकत्त्व असले पाहिजे. ही व्यापकतेची मुळ कल्पना आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)४७). कोणताही भेद न मानता हिंदूंनी अल्लाचे नामस्मरण करणे आणि इस्लामांनी ईश्वराचे नामस्मरण करणे याला व्यापक भावना म्हणता येईल. सर्वांनी 'ईश्वर-अल्ला' यांचे नाम-स्मरण केले पाहिजे. यातूनच व्यापक भावनेचा विकास होईल असा दादांना विश्वास वाटत होता. समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत जी व्यापक भावना व जी अनुकूल प्रक्रिया असते त्यातून सहयोगाची प्रक्रिया निर्माण होते.

'सहयोग' आणि 'प्रतिकार' या दोन्ही प्रक्रियामध्ये भिन्नत्त्व दिसून येते. सहयोगामध्ये सर्वांना सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे सहयोगात व्यापकतेचे तत्त्व दिसून येते. दादा धर्माधिकारी सहयोगाचा अर्थ असा स्पष्ट करतात की, "दोघांच्या प्रयत्नांनी मिळून जो सामान्य गुणांचा विकास होतो त्याचे पर्यावसन 'सहयोगात' होत असते. सामान्य गुणांच्या उत्कर्षासाठी होणाऱ्या सामुदायिक प्रयत्नाला संयुक्त पुरूषार्थाला 'सहयोग' असे म्हणतात." (धर्माधिकारी दादा (१९९८)४८). समाजातील सर्वसामान्य वर्गाच्या विकासासाठी जे सामुदायिक प्रयत्न केले जातात त्याद्वारे हळूहळू सहयोगाची प्रक्रिया घडत जाते. सहयोगाशिवाय कोणताही प्रयत्न सहसा यशस्वी होत नाही. सहयोगात प्रत्येकजण आप-आपल्या पद्धतीने योग्य मार्गाचा स्वीकार करून मदत करत असतो. सहयोगाबरोबरच प्रतिकाराबाबत बोलायचे झाल्यास दादा धर्माधिकारी म्हणतात, "प्रतिकार

म्हणजे व्यावर्तक भावनेचे आणि दोषांचे निराकरण करणे." (धर्माधिकारी दादा (१९९८)४८). दोषांच्या वाईट प्रवृत्तीच्या निराकरणासाठी आजही प्रतिकाराची गरज दिसते. याच प्रतिकारातून आणि सहयोगातून सामुदायिक प्रतिकाराचा उदय होतो तो म्हणजे, "'सहयोग' म्हणजे व्यापक भावनेचे आणि गुणांचे संवर्धन करणे. व्यावर्तक भावनेच्या निराकरणासाठी केलेला 'प्रतिकार' होतो." (धर्माधिकारी दादा (१९९८)४८).

समाज धारणेसाठी सहअनुष्ठान असणाऱ्या तत्त्वांची आवश्यकता असते. त्यामुळे सह-अनुष्ठानाला सामुदायिक प्रतिकारात महत्त्वाचे स्थान आहे. सहयोग हा वाईटाचा न करता तो वाईट माणसाशी करणे आवश्यक असते. याउलट वाईटाचा प्रतिकार करावा हाच 'सहयोगात्मक प्रतिकार' होय. वाईट प्रवृत्तीच्या नाशासाठी वाईटाचा प्रतिकार करावा लागतो. अन्यथा त्याचे प्रस्त वाढत जाते. 'क्षमा वीरस्य भूषणम' हे सुभाषित बरोबर असले तरी क्षमा अपराध्याला करायची अपराधाला नव्हे. म्हणून अपराधाचा प्रतिकार झालाच पाहिजे. सहयोगात्मक प्रतिकार हा अहिंसेवर अधारित असतो. दादांच्या मते, "अहिंसेच्या प्रक्रियेत सह-अनुष्ठान सुलभ आणि संभवनिय असते. कारण तिच्यात हितसंबंधाचे समानतत्व असते. तेथे दोघांचे सहकार्य जरी झाले नाही तरी सह-अनुष्ठानाची पात्रता त्याच्यात येते." (धर्माधिकारी दादा (१९९८)५१). म्हणून सह-अनुष्ठानासाठी आणि सहयोगासाठी अहिंसेची गरज असते. व्यक्तींच्या समान गुणांच्या विकासासाठी एकत्रित प्रयोगातून सहयोग होतो. जेथे दोषनिराकरणाचा प्रयत्न होतो तेथे एकपक्षीय प्रतिकार संभवतो म्हणून दोघांचे निराकरण हे दोघांच्याही कल्याणाचे असावे लागते. त्यामध्ये हितसंबंधाचे समानत्त्व ही गरजेचे असते. तर अशा ठिकाणी विरोध नसावा असा दादांचा सहयोगात्मक प्रतिकाराचा विचार आहे.

दादा धर्माधिकारी यांनी सहयोगात्मक प्रतिकाराबरोबरच सत्याग्रहाच्या विचारांना चालना देण्याचे कार्य केले आहे. सत्याग्रहापासून वेगळा असा सहयोगात्मक प्रतिकाराचा विचार त्यांनी मांडला. तेव्हा सत्याग्रहाचा विचार समजावून घ्यावा लागतो असे ते म्हणतात, "अन्यायाला प्रतिकार करण्याच्या क्षेत्रात मानवाने आपल्या गुणांचा विकास

करण्याच्या क्षेत्रात मानवाने आपल्या गुणांचा विकास करण्याचा प्रयास केला यामधून सत्याग्रहाचा अविष्कार झाला." (धर्माधिकारी दादा (२००२)८२). व्यक्ती किंवा समाजावरिल अन्यायाला प्रतिकार करण्याचे सत्याग्रह हे एक साधन आहे. सत्याग्रहाचा मार्ग सरळ सोप्या पद्धतीचा असतो कारण सत्याग्रहाच्या प्रक्रियेसाठी कोणत्याही प्रकारच्या हिंसेचा वापर केला जात नाही. अहिंसेत सत्याग्रहाच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणता येते. यामध्ये हृदय-परिवर्तनाला महत्त्व अधिक आहे. सत्याग्रहात विरोधी व्यक्तीवर, संस्थेवर कोणत्याही प्रकारच्या दृश्य-अदृश्य, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, मानसिक, शारीरिक दबावाचा वापर केला जात नाही. अशी सत्याग्रहाची प्रक्रिया आहे. समाज परिवर्तन करण्यासाठी प्रथम व्यक्तींचे हृदय-परिवर्तन करून समाज-परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो.

समाजात शांतता राखणे एवढाच सत्याग्रहाचा उद्देश नाही तर ते एक समाजात व्यक्तीवर होणाऱ्या अन्यायाची वाचा शांततेच्या मार्गाने फोडण्याचे तंत्र आहे. सत्याग्रह विध्वंसक आणि समाजाला घातक नसावा हे एक सत्याग्रहाचे लक्षण मानता येईल. तेथे दंडशक्तीचा, सक्तीचा वापर केला जात नाही. कारण सत्याग्रहाचा मूळ हेतू मत-परिवर्तनाचा आहे. त्यामुळे सत्याग्रहात हिंसेचा संबंध येत नाही. दादा धर्माधिकारी म्हणतात, "सत्याग्रह हे शस्त्र-निरपेक्ष वीरतेचे शस्त्र आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)२८९). सत्याग्रह हे अहिंसक युद्ध असते त्यामुळे समाजात एकमेकांविषयी द्वेष निर्माण होत नाही तर "सत्याग्रहात पापी अपराधी माणसासाठी प्रेम, स्नेह असते. प्रतिपक्षाच्या दृष्टिकोनातप्रती आदर असतो. अशा व्यवस्थेत सत्याग्रह होतो." (धर्माधिकारी दादा (२००२)१३८). विरोधी विचारांनाही आदराची वागणूक देवून प्रेम, स्नेह वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. विनय आणि प्रेम नसेल तर सत्याग्रह होवू शकत नाही. प्रतिपक्षाचा अनाचार आणि अन्यायजनक व्यवस्था नष्ट करणे तर प्रतिपक्षाचे जीवन असंभव न करणे हा सत्याग्रहाचा उद्देश असतो. सत्याग्रहात जरी प्रतिकार असला तरी तो सहनशील अहिंसक मार्गाचा आणि अहिंसात्मक पुरूषार्थ असणारा प्रतिकार असतो.

सत्याग्रहामध्ये वैयक्तिक सत्याग्रही आणि सामूहिक सत्याग्रही असे दोन विभाग केले जातात. वैयक्तिक सत्याग्रहात जरी एक व्यक्ती करत असली तरी त्यामध्ये सत्याग्रही व्यक्ती आपल्या स्वार्थाचा विचार करत नाही. ज्या सत्याग्रहात जनतेचा सहभाग असतो त्यास सामूहिक सत्याग्रह न म्हणता सह-सत्याग्रह म्हणतात. सह-सत्याग्रहात समाजाच्या विकासाच्या उद्दिष्ट्यांच्या पूर्ततेचा हेतू असतो. तसेच अन्यायाच्या परछायेतून समाजाची मुक्तता करण्यासाठी उपाय अहिंसा आहे आणि अहिंसात्मक सत्याग्रहात विशुद्ध आणि यथार्थ सत्याग्रह आहे. अशा प्रकारे दादा धर्माधिकारी यांनी सहयोग, प्रतिकार, सहयोगात्मक प्रतिकार आणि सत्याग्रह याबाबत विवेचन केले आहे.

**साध्य-साधन विवेक :**

मो. क. गांधी यांनी आपल्या व्यक्तीगत जीवनात सामाजिक मूल्यांना व्रताचे स्वरूप दिले आहे. उपनिषिधांमध्ये साध्य आणि साधने यांच्यात एकतेचा संकेत नमूद केला आहे. ऋषी म्हणतात, ''तपो ब्रह्मइति' तप ब्रह्म आहे. साधन ही साध्य आहे.'' (धर्माधिकारी दादा (२००२)१९५). तसेच गांधी म्हणतात, ''क्रांती हे जरी सर्वांचे साध्य असले तरी त्या साध्याच्या साधनात ही महत्त्वाची क्रांती आहे. या प्रक्रियेला गांधींनी 'साध्य-साधन विवेक' असे नाव दिले.'' (धर्माधिकारी दादा (१९९८)५३). तर दादांच्या मते, साध्य-साधनांचा विवेक नसेल तर ते घटक साध्यास बाधक असतात. क्रांतीच्या प्रक्रियेत साध्याप्रमाणे साधनही निश्चित करावे लागते.

साध्याला साधनाबरोबर जोडून मानवाला साधननिष्ट बनवने ही एक कुशलता मानता येईल. कारण सामाजिक क्रांती आणि व्यक्तीगत साधना त्या दोन्हीही जीवनाच्या महान कला आहेत. प्रत्येकाच्या जीवनात व्यक्तीगत साधना आणि सामाजिक साधना यांचे निष्ठापूर्वक अनुष्ठान असावे लागते त्यामुळे संपूर्ण जीवन कलात्मक होते. यादृष्टिने व्यक्तीगत जीवनात साध्य आणि साधन यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. लोकमान्य टिळकांच्या 'साधनांना अनेकता' या तत्त्वाबद्दल दादांनी असा अर्थ घेतला आहे की, साधनांना अश्रिय: अविवेक असा केला जातो. साध्य प्राप्तीची अनेक साधने असू

शकणार नाहीत असा आग्रह ठेवू नये. पण अनेक साधने असली तरी ती साध्याला अनुरूप असली पाहिजेत. आणि साध्यप्राप्तीची पात्रता त्या साधनात असली पाहिजे. अशी त्यात अट आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)५५). साधनामध्ये साध्यप्राप्तीची आवश्यक असणारी शक्ती असावीच लागते. त्याशिवाय साधन वैज्ञानिक ठरत नाही. म्हणून साध्यास साधन सुसंगत असावे लागते. आजच्या सामाजात प्रामुख्याने सहजीवन हे जर साध्य मानले तर त्या सहजीवनासाठी आवश्यक असणारे प्रेम, स्नेह, बंधुत्त्व ही साधने अनुरूप असावी लागतात. साध्याला आवश्यक असणारी साधने विषम असल्यास त्यातून संघर्षाची निर्मिती होते. म्हणून साध्य प्रत्यक्षात उतरवण्यासाठी साधने योग्य व अनुरूप असावी लागतात.

साध्याचा हेतू साध्य करण्यासाठी साध्य साधने परस्पर सुसंगत असावी लागतात. कारण साध्य हे साधनात लपलेले असते. साधन असे असावे की, ज्याच्यात साध्य प्राप्त करण्याची शक्ती निसर्गतः वैज्ञानिक स्वरूपात असावी त्यासाठी साधनांचा निश्चय बुद्धीपूर्वक करावा लागतो. साध्याचा निश्चय करतात ज्याप्रमाणे व्यक्ती बुद्धीपूर्वक विचार करतो. कारण साध्य आणि साधन यात साम्य असणे गरजेचे असते. दादा धर्माधिकारी म्हणतात, मनुष्याचे सहजीवन सुखी, संपन्न स्थापन करणे हे आपले साध्य असले पाहिजे. त्यासाठी शास्त्रशुद्ध क्रांतीचे साधन योग्य आहे. साध्यांच्या पूर्ततेसाठी शास्त्रशुद्ध अहिंसक क्रांती समाजात प्रगती करू शकते. म्हणून क्रांतीत साध्य आणि साधनांना महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक जीवन आणि व्यक्तीगत जीवनात साधनांना एकत्रित करून व्रतांना सामाजिक मूल्य बनविण्याची गांधींची आकांक्षा होती त्यामुळे सत्य, अहिंसा, अस्तेय व अपरिग्रह या व्रतांना समाजात यशस्वी होण्यासाठी बहुमूल्य स्थान दिले आहे.

**अ ) सत्य :**

'सत्य' हे सर्व व्रतांचे अधिष्ठान आहे. म्हणून व्यक्तींनी सत्याच्या मार्गाचे अनुकरण केल्यास यशस्वीतेचा मार्ग हमखास सापडतो. प्रत्येकाने आपल्या सामाजिक वैयक्तिक जीवनात सत्याचा प्रयोग करणे गरजेचे आहे. दादा म्हणतात, "सामाजिक जीवनाच्या स्वरूपात जेव्हा आम्ही सत्याची उपासना करतो तेव्हा आमच्यासाठी ध्रुवसत्य हे आहे की, दुसरी व्यक्ती आणि मी एक होणे, माझ्या बरोबरीची एकता माझ्या मानसिकतेचा आधार

आहे. सदाचाराचा आधार नैतिकतेचा आधार मनुष्याच्या सामाजिकतेचा आधार दुसऱ्या बरोबरची आमची पारमार्थिक एकता आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)१९८). एकता ही सामाजिक जीवनातील परम आणि ध्रुवसत्याचे अधिष्ठान आहे. मनुष्याचे वनस्पती आणि प्राणी म्हणजे संपूर्ण जीवसृष्टीशी असणारे संबंध व जेवढे जीव आहेत त्या जीवांच्या एकतेची मात्रा ध्रुवसत्य आहे. तर साधारण आणि प्रतिष्ठित विचार करण्याची आमची दुसऱ्याशी असणारी एकता जीवनाचे परमसत्य आहे. दादा धर्माधिकारी यांनी सामाजिक दृष्टिकोनातून सत्याचा अर्थ असा सांगीतला आहे की, "जी निरपेक्ष आहे सापेक्ष नाही. जिला सिद्ध करावे लागत नाही हा सामाजिक दृष्टिकोनातून सत्याचा अर्थ आहे." (धर्माधिकारी दादा (२००२)१९८). अशा प्रकारे सत्याचा सापेक्ष आणि निरपेक्ष दृष्टिकोनातून अर्थ सांगून साध्य-साधन विवेकात सत्याला प्रथम स्थान प्रदान केले आहे.

**ब ) अहिंसा :**

सत्यानंतर ज्या एकादश व्रताचा क्रम येतो ते व्रत म्हणजे अहिंसा होय. गांधी म्हणतात, "चालत होतो सत्याच्या शोधात परंतू अहिंसा मिळाली. एक दरवाजा मिळाला तो बंद होता, चावी होती अहिंसा आणि जोपर्यंत त्या दरवाज्यातून जात नाही तोपर्यंत सत्याचे दर्शन मला होत नव्हते." (धर्माधिकारी दादा (२००२)१९८). सत्य आणि अहिंसा एकमेकांत गुंतलेल्या आहेत. त्यांना वेगळे करणे शक्य नाही. सत्य आणि अहिंसा यांना एक प्रेमजोडीच म्हणावे लागेल. दादा धर्माधिकारी म्हणतात, "साध्याला अनुरूप असे साधन अहिंसात्मक प्रतिकाराचेच असू शकते. कारण त्यात वीरवृत्तीचा आणि निर्भयतेचा परिपोष होतो." (धर्माधिकारी दादा (१९९८)६०). साध्य हेतूपूर्तीसाठी हिंसेचा वापर केल्यास त्यातून समाजविघातक घटना घडण्याची साशंकता निर्माण होते. म्हणून क्रांतीची सर्वच साधने ही अहिंसक असावी लागतात. कारण वीरवृत्तीमध्ये आत्मा हा निर्भयता असतो. अहिंसेमध्ये द्वेष, मत्सर, राग, लोप यांचा नाश होतो आणि ती प्रेम, स्नेह, करूणा यातून प्रकट होते. दादांच्या मते "अहिंसा आणि सदाचाराचा पाया प्रेममुलक असतो. आणि तादात्म्यात त्याची परिणती होते. त्यामध्ये दुसरा सिद्धांत, दुसरे व्रत आहे अहिंसा." (धर्माधिकारी दादा (२००२)१९९). 'अहिंसा' हा नागरिकांच्या जीवनाचा आणि लोकनीतीचा अधारभूत सिद्धांत आहे. कारण राजकीय क्षेत्रातील अहिंसा

ही लोकनीतीतून प्रकट होते. त्यामुळे लोकनीती जनतेच्या विश्वासात पात्र आहे. याच बरोबर आर्थिक क्षेत्रातील अहिंसा ही सह-उत्पादन आणि सहयोगातून व्यक्त होते. अहिंसेची प्रक्रिया ही क्रांतीच्या प्रक्रियेतील पुढची पायरी आहे. हिंसा ही भयमूलक असते. हिंसेमध्ये एकमेकांची निष्ठा समान असते पण तिच समानता एकमेकांच्या भीतीवर आधारलेली असते. वीरता निर्भयता तिचा आधार नसतो. फक्त अहिंसेचाच आधार वीरता असते. त्यामुळे हिंसा वीरवृत्तीला परिपोष नसते. दादा असे मानतात की, "एकमेकांच्या भीतीवर ज्या हिंसेचा आधार तिच्यातून सहउत्थान होवू शकत नाही. माझेही उत्थान व्हावे. तुमचेही उत्थान व्हावे असे हिंसेच्या साधनात शक्य नाही. म्हणून हिंसेचे साधन संघर्षाइतकेच विषम आहे." (धर्माधिकारी दादा (१९९८)६०).

**क ) अस्तेय-अपरिग्रह :**

अहिंसा ही अस्तेयाच्या स्वरूपात प्रकट होते. अस्तेयामध्ये कोणीही दुसऱ्याची वस्तू किंवा इतर गोष्टींची मागणीची इच्छा, आकांक्षा न करणे होय. कोणत्याही प्रकारची मनात स्वार्थात भावना नसावी म्हणजे अस्तेय होय. दुसऱ्याची कोणतीही वस्तू घेणार नाही. आणि घेण्याची इच्छासुद्धा मनात धरणार नाही. चोरी न करणे फक्त अस्तेय नाही तर अस्तेय एक अशी प्रवृत्ती आहे की तिची निष्ठा स्थिर आहे. समाजात अस्तेयाबरोबर अपरिग्रह समाजात असणे गरजेचे आहे. दादांच्या मते, अपरिग्रहाचा अर्थ असा आहे की, "आपल्या आवश्यकतेसाठी जेवढी वस्तू मी ठेवतो ती आपल्या मालकीयतसाठी ठेवत नाही." (धर्माधिकारी दादा (२००२)२०२). अपरिग्रहात व्यक्तीजवळ असणारी साधन संपत्ती मालकी हक्काची म्हणून जवळ ठेवली जात नाही. तर गरजेसाठी आवश्यक असणारीची संपत्ती जवळ ठेवली जाते. त्यामुळे साधन संपत्तीचा संग्रह कोणाकडे होत नाही. संग्रह असला तरी तो समाजाच्या विकासासाठी उपभोगासाठी असतो. असे दादांचे विचार आहेत.

अशा प्रकारे दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदयाचा विचार स्पष्ट होतो. या अनुषंगाने पुढील प्रकरणात दादांनी केलेला सर्वोदय संकल्पनेचा विकास आणि त्यांच्यावरील मर्यादा व समकालिन औचित्य तपासण्यात येणार आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) भावे विनोबा : (१९८९), 'सर्वोदय विचार आणि स्वराज्य शास्त्र', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

२) धर्माधिकारी दादा : (१९९८), 'सर्वोदय दर्शन', सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

३) धर्माधिकारी दादा : (२००२), 'सर्वोदय दर्शन', सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

४) धर्माधिकारी दादा : (२००२), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-१, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

५) धर्माधिकारी दादा : (२००२), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-२, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

६) धर्माधिकारी दादा : (२००३), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-३, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

७) धर्माधिकारी दादा : (२००५), 'समग्र सर्वोदय दर्शन' खंड-४, सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.

८) धर्माधिकारी दादा : (१९९६), 'मनीषीची स्नेहगाथा', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

९) धर्माधिकारी दादा : (१९९२), 'क्रांतीच्या संदर्भात', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

१०) धर्माधिकारी दादा : (१९९३), 'स्त्री-पूरूष सहजीवन', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

११) धर्माधिकारी दादा : (१९९८), 'लोकशाही : विकास व भविष्य', परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

१२) धर्माधिकारी तारा : (२००२), 'महाराष्ट्राचे शिल्पकार आचार्य दादा धर्माधिकारी', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि कंपनी, मुंबई.

१३) गांधी मो. क. : (१९५५), 'सर्वोदय', नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.

१४) पुष्पिता : (१९९९), 'दादा की सुक्तीयाँ', सर्व-सेवा-संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी.